



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक २०७ * नांदेड * रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# उपराष्ट्रपती पदाची निवडणूक जाहीर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर उपराष्ट्रपती पदाची निवडणूक जाहीर झाली आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत भाजपप्रणित एनडीए आणि इंडिया आघाडी आमने सामने येऊ शकतात. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस २१ ऑगस्ट आहे. तर, ९ सप्टेंबरला मतदान होणार आहे. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या निमित्तानं दोन्ही आघाड्यांकडे खासदारांचं पाठबळ नेमकं किती आहे हे स्पष्ट होईल.

संख्याबळाचा विचार करता उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी भाजपप्रणित एनडीएकडे आवश्यक खासदार आहेत. विरोधी पक्षांच्या आघाडीकडून उपराष्ट्रपती निवडणूक लढवली जाणार की नाही, हे अद्याप स्पष्ट झालं नाही. यापुवी २०१७ आणि २०२२ यावेळच्या निवडणुकीत एनडीएनं विजय मिळवला होता.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार मतदान करतात. भाजपकडे लोकसभेत २४० आणि राज्यसभेत १०२ खासदार आहेत. संसदेतील एनडीएच्या पक्षांचं मिळून ४५७ खासदार सत्ताधाऱ्यांकडे आहेत. यामुळं एनडीएचे उमदेवार उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवणार हे स्पष्ट आहे.

इंडिया आघाडीचा विचार केला असता काँग्रेसकडे लोकसभेत ९९ आणि राज्यसभेत २७ खासदार आहेत. इंडिया आघाडीच्या दोन्ही सभागृहातील खासदारांची संख्या ३०० पेक्षा अधिक आहे. मात्र, या संख्याबळावर उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळणं अशक्य आहे.

## आज रविवारीही सर्व बँका सुरू राहणार


**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आज रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी देशातील सर्व बँक शाखा सुरू राहतील. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत २०वा हप्ता वितरित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व बँक शाखा सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## रेल्वेस्थानकातून दोन लाखांची बॅग लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील रेल्वेस्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्र. १ वर प्रतीक्षालयात थांबलेल्या एका व्यापाऱ्याची अज्ञात चोरट्याने नजर चुकवून २ लाख रूपये व साहित्य बॅग लंपास केली. ही घटना दि. १ ऑगस्ट रोजी रात्री ९.४५ वाजेच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली येथील सुहास राजाभाऊ गंधेवार (वय ६०) किराणा व्यापारी रा. कोमटी गल्ली, हिंगोली हे रायचूर एक्सप्रेसने प्रवास करण्यासाठी नांदेड येथील रेल्वेस्थानक प्लॅटफॉर्म १ वर रेल्वेची वाट पाहत प्रतीक्षालयात बसले होते. दि. १ ऑगस्ट रोजी रात्री ९.४५ वाजेच्या दरम्यान हात धुण्यासाठी शौचालयाकडे गेले असता अज्ञात चोरट्यांनी त्यांची बॅग लंपास केली. बॅगमध्ये नगदी २ लाख रुपये व इतर कागदपत्रे होते. याप्रकरणी गंधेवार यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचा पुढील तपास हवालदार देशमाने करत आहेत.




## कंधारच्या शिक्षकाचा अर्धापूरच्या लॉजमध्ये आढळला मृतदेह

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** खाजगी संस्थेवर कार्यरत असलेल्या शिक्षकाचा अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव पाटीजवळ एका लॉजमध्ये शनिवारी सकाळी ११ वाजता मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती.



अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव परिसरात हॉटेल स्वराज फॅमिली रेस्टॉरंट आणि लॉज आहे. येथे आशिष भाऊसाहेब शिंदे हे शिक्षक मुक्कामास होते. शनिवारी सकाळी शिंदे आपल्या रूममध्ये अत्यवस्थ अवस्थेत आढळून आले. हॉटेलच्या व्यवस्थापनाने तात्काळ अर्धापूर पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम, जमादार भीमराव राठोड, राजेश गुट्टलवाड, अरूण पाटील हे भेट देऊन शिक्षक आशिष शिंदे यांना रुग्णवाहिकेने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता यावेळी डॉक्टरांनी शिंदे यांना मृत घोषित केले.

आशिष भाऊसाहेब शिंदे हे खाजगी संस्थेवर शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांचा मृत्यू कशामुळे झाला हे समजू शकले नाही.



# आठवणींचा पाऊस

ललित



थोड्या वेळापुरताच वारा होतो गप्प. जणू थकून भागून दमलेल्या वासरासारखा अन् एकाकी येतात ढग भरून...आभाळ झाकोळून जाते. काळंमिट्ट...पावसाचे टपोरे थेंब टपटपायला लागतात. बघता बघता पावसाची विलंब गती द्रुत होऊन जाते. पाऊस बेभान....पाऊस धुव्वाधार...! पाऊस एकदमच छोटा होणारा...पाऊस एकदमच मोठा होणारा...पाऊस लहरी...! पाऊस मधून मधूनच कुशल वादकाने वाजवावेत तुकडे, मुखडे आणि यावे समेवर तसेच. तसेच...! अगदी तसेच..!! काही वेळ पावसाचा खेळ चालू राहतो. 'सम से समतक' किंवा 'काल से सम तक' असा. वादकाने वाजवता वाजवताच मध्येच पकडावा रेला अन् श्रोत्यांचा रोखला जावा श्वास समेवर येईपर्यंत तस्संच..! सारी सृष्टीच जणू श्वास रोखून धरते अन् धडाडत राहतो पावसाचा धुव्वाधार ताल...! आणि कहर म्हणून की काय, वाजवत वाजवतच पावसाचा बेभान व्हावा 'चक्रदार' आणि 'सलाम-प्रणाम-कत्-धाऽऽ' ची व्हावी जोरदार तिहाई... तस्सीच भल्याभल्यांची उडून जाते भंबेरी, राखून धरलेला श्वास व्हावा मोकळा अन् सोडावा सुस्कारा सुटकेचा... तसंच...!

एका अनामिक पकडीतून सुटल्याचा व्हावा भास अन् रसिकांनी भारावून जाऊन द्यावी दाद. मनमुराद...! नकळत हातही टाळीसाठी सरसावतात. तस्संच...! अगदी तस्संच...!!

निसर्गातल्या या विराट अन् अचाट सामर्थ्यापुढं नतमस्तक व्हावं नास्तिकानंही....! एकाएकी. तसंच हे....! आणि नकळत बाहेर पडतात उद्गार 'व्वा क्या बात है !' चे प्रत्येकाच्या तोंडून...! पावसासारखं मनालाही कुठेतरी बरसता आलं असतं तर किती चांगलं झालं असतं नाही ! पण तशी सोय निसर्गानं मानवाला दिली नाही. म्हणून हे असं मनाचं बरसणं. मनातच. मनाच्या विषण्णं आठवणीत आपण होऊन जातो खट्टू. भावनांच्या हिंदोळ्यावर स्वार झालेलं मन मात्र बरसत राहते पावसासारखं. पावसाचा ठेका धरून बरसून घेतं मनामनात... मनसोक्त...! खरंतर मनानं असं मनस्वीपण जपायलाच नको. पण मन असं की अत्यंत हळवं. इंद्रधनुष्याच्या रंगासारखं...! मनाचे अनेक कंगोरेही एका भावनेतून अनेक भावनेत गुंतून गलेले. सांगता येत नाहीत कोणत्या रंगाची सुरुवात नेमकी कोठून झाली. अन् नेमके कोठे संपली... मन नुसतंच भावविभोर झालेलं. आठवणींच्या हिंदोळ्यावर स्वार झालेलं.

पाऊस पडलाय... ओसरलाय.... सारी सृष्टी आता खळाळत वाहते आहे. ओलाचिंब गारवा वातावरणात भरून गेलाय. वर आभाळात ढगांची ही गर्दी....! त्यांचं क्षणाक्षणाला बदलत जाणारं धूसर रूप....झाडे वेली पानांपानांतून न्हाऊन निघालीत... एक नवयौवना सुकवते केस, तसं हे सृष्टीचं निथळणं...! अशा वातावरणात काही गाण्यांची मुद्दाम आठवण होते- 'नभ उतरू आलंऽऽ ऽऽऽ, सारं झिम्मड झालंऽ ' लता दिदींच्या सुरांची जादू काय सांगावी ? ही जाणीवच जणू या गाण्यातून जिवंत करून जाते. निसर्गाचं अस्सं रूप साक्षात होते...! पाऊस असाच लागून राहिलेला. झडपाऊस...भीजपाऊसझिम्म पाऊस...! वाटतं, सारं आसमंतच खाली उतरलंय. तृप्तीचं ढेकर कसं मस्त असतं नाही? तसंच हे ! नकळत मनही गायला गुणगुणायला लागते. बरं भविष्याच्या प्रांगणातही....! आणि आठवणींचा तालही धरतो. अस्साच पावशासारखा..! तालबद्ध.. लयबद्ध... जणू आठवणींचे तुकडे, मुखडे, रेले...उठावणे...काल से काल तक... समसे सम तक... ठेका तिहाई.. सलाम-प्रणाम कत धा चा. ठेका मनाचा. हेका मनाचा... ठेका कालदिक्काला पर्यंत..' ठेका' संपेपर्यंत...! कळत नाही.. गोड, कडू अनुभवांच्या तुकड्या-तुकड्यांत किती अन् कसे हरवून जातो आपण. कळत-नकळत तुकड्या, मुखड्यांच्या अशा लयींबरोबर हरवून जातो आपण... जणू आपलं अस्तित्वही..! आठवणींचा पाऊसही... तस्साच...!

आकाशात ढगांची गर्दी झाली की, या कातरवेळी माणसाचं मन फारच हळवं होऊन जाते. उगीच 'त्या' ला म्हणे 'ती' ची आठवण सतावीत राहते. मनाची ही अगतिकता नि अनामिक ओढ गुणगुणायला लागते-

'पंछी बनू उडते चलू मस्त गगन मे।
आज नया खेल खेलू मस्त गगन मे।।
किंवा
पंख होते तो उडं आते रे।
कैसे आऊँ बल माँ ?'

कधी कधी तर तिच्या किंवा त्याच्या अनेक आठवणी त्याला किंवा तिला सतावत राहतात. हातून घडून गेलेल्या अनेक चुकांची आठवण होत राहत. तो क्षण पुन्हा पकडता आला तर? पण छे! श काही सोयच नाही. आभाळातल्या मेघांप्रमाणंच मनही बरसत राहते सरीवर सरी रिचवून...! बाहेर पाऊसही झिम्मड होऊन बरसायला लागतो. नकळत डोळ्यांतूनही ओघळायला लागतात धारा.... आठवणीच्या....!! आठवणींचा पाऊसही असाच. झिम्मड...! बेभान होऊन बरसायला लागतो. कधीकधी नेत्रांतूनही झरायला लागतो, झिरपायला लागतो. आठवणींचा निचरा होईपर्यंत...! मनाचा अन्

पावसाचा पकडला जातो ठेका. बाहेर कोसळणाऱ्या वळचणींच्या पडणाऱ्या पांगोळ्यांसोबत... अन् होऊन जाते आसवांची... आठवांची दमदार तिहाई...! अन् खाड्कन येतो भानावर; तर पाऊस उघडलेला....! पाणी आता निथळत आहे, पानापांनावरून....! अनेक सतावणाऱ्या अतितीव्र भावनांचा निचरा झाल्याची जाणीव...! आता मस्त मोकळेपणा जाणवतोय... मन हलके हलके झाल्यासारखे वाटतेय... आतापर्यंतच्या या कालावधीची कालक्रमणा पाहिली, तर ती लागलेली तंद्री का समाधी? ती लय, विलय की, अंतर्लय? तादात्म्यता? की, तदरूपता? छे! काही उमगत नाही....! काही कळत नाही...! घडून जाते पावसाचे बरसणे नि रडून घेते मनही; त्या पावसाबरोबर....! मधून मधून पडावं लख्खं लख्खं उन्हं...अन् टपटपत राहावेत थेंब पर्णापर्णांतून...तस्स्याच...! चुकार आठवणीही तरळून जातात त्या टुकार नि चुकार थेंबाथेंबांतून.

'गुज ओठांनी ओठांना सांगायचं
एका पावसात दोघांनी भिजायचं'

एखादी जाणीव कधी होत राहते. कधीकधी मन ओढ घेत राहते, पण जर ती जाणीवच 'उणीव' असली तर...?.तर काही सांगायलाच नको.!


'अजुनी मला आठवते, ती रात पावसाळी
मने धुंद वेडी, हवा पावसाळी.......'

मनाला होणाऱ्या या जाणिवा एवढ्या समृद्ध असतात की, बाकीच्या उणिवा आठवतही नाहीत. आठवांचा हा जागर प्रत्यक्षाची अनुभूती देतो. या पावसाचं हेही एक बरं. थोड्यावेळापुरतंच का होईना, उणिवा विसरून जातो आपण...!...अन् हळूच येतो भानावर, तर हे लख्खं उन्हं पडलेलं..! ह्याबरोबरच चोंदलेल्या मनालाही येते जाण. एक उभारी....अन् वास्तवातल्या सान्निध्यांतले आपले जागृतपण...

निसर्गाच्या या नयनरम्य नाट्यांतून प्रवेश घडवत जातात, तद्वतच या स्वप्नावस्थेतूनही येतो आपण बाहेर अन् चालू लागतात पाय....मुक्कामाकडे...रिकाम्या रिकाम्या झालेल्या वाटेने. पाणी वाहून जाऊन स्वच्छ झालेल्या वाटेने...! अगदी रिकाम्या मनाने... हलक्यातरल संवेदनेत...! निसर्गात झालेल्या नव बदलासंह आपणही तरळत राहतो...नवचैतन्यांत हुंदडत राहतो. पंख झडकून मारावी भरारी पाखराने तसेच...! मनाच्या या तरल अवस्थेत तरळत राहतो.... आठवणी आणि पाऊस दरवेळी...! पुन्हा...पुन्हा..!!

**-प्र. श्री. जाधव**
नांदेड
मो. ८६६८८७१२६४

# 'धर्म ते राष्ट्रधर्म' ग्रंथातून धर्मनिरपेक्षतेकडे वाटचाल




पुस्तक परीक्षण

प्रा. प्रमोद वाघमारे
नांदेड
मो. ९६५७२७८२१७

डॉ. अनंत राऊत लिखित 'धर्म ते राष्ट्रधर्म' हा ग्रंथ धर्मविरोधी नसून धार्मिक भिन्नतेपेक्षा भावनिक ऐक्य निर्माण करणाऱ्या, अशा एकमेव राष्ट्रधर्माच्या उभारणीचे महत्त्व सांगणारा आहे.

प्राचीन काळातील धर्मसंस्थेचे अस्तित्व आजही टिकून आहे आणि धर्मामुळेच मानवी नीतिमत्ता जिवंत राहिली आहे. धर्म माणसाला नैतिक मूल्यांची शिकवण देतो, त्यामुळे त्याला माणूस म्हणून जगण्याची दिशा प्राप्त होते. मात्र आज धर्माच्या स्वरूपात बदल होताना दिसतो. आपल्या धर्माची उपासना करणे गैर नाही, पण परधर्माबद्दल वाढणाऱ्या द्वेषातून धार्मिक संघर्ष उद्भवत आहेत. कारण भारतात अनेक धर्म अस्तित्वात असून त्यातील देवाला 'ईश्वर', 'अल्लाह', 'गॉड' अशा विविध नावांनी संबोधले जाते. भिन्न धर्मांचे सण-उत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरे होतात.

वर्तमान काळातील विविध धर्मीयांमधील वाढते संघर्ष आणि त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला बसणारा तडा यावर उपाय शोधण्यासाठी, लेखकाने या ग्रंथात भारतातील विविध धर्मांची उत्पत्ती, विकास आणि तत्त्वज्ञानाची थोडक्यात पण सखोल मांडणी केली आहे.

लेखक स्पष्ट करतात की, बहुतांश धर्मांचे तत्त्वज्ञान काल्पनिक व अध्यात्माधिष्ठित आहे, याला बौद्ध व जैन या विज्ञानवादी धर्मांचा अपवाद आहे. धर्म माणसाला सुखी, समृद्ध जीवन जगण्याचा नैतिक मार्ग दाखवतो, तरीही माणसाच्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे धर्ममूल्ये पायदळी तुडवली जात असून परधर्माबद्दल द्वेषभावना वाढते आहे. यामुळे निर्माण होणाऱ्या धार्मिक संघर्षातून राष्ट्रीय ऐक्याला तडा जात आहे. म्हणूनच नव्या राष्ट्रनिर्मितीसाठी सर्वसमावेशक असा 'राष्ट्रधर्म' उभारण्याची गरज लेखक ग्रंथातून अधोरेखित करतात.

लेखकाने हा ग्रंथ एकूण दहा प्रकरणांत विभागला आहे. प्रारंभीच्या मनोगतात 'माझी धर्म व राष्ट्रविषयक भूमिका' या विभागात लेखक स्पष्ट करतात की, त्यांच्या विचारांचा उद्देश कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणे नाही. मानवप्राण्यातील विविध भावना आनंद, दुःख, भीती, लोभ, अहंकार, द्वेष सामान्य असून माणूस सुखी आणि सुरक्षित राहण्यासाठी धडपडतो. बुध्दीमान असल्यामुळे माणसाला विवेक आणि संवेदना प्राप्त झाली आहे. मग सर्व धर्म समान शिकवण देत असताना वेगवेगळे धर्म का निर्माण झाले? धर्मांनी माणसामाणसात बंधुभाव निर्माण करण्याऐवजी संघर्षच का निर्माण केला? या प्रश्नांवर विचार करत लेखक पारंपरिक धर्माच्या कल्पनावादी तत्त्वज्ञानासमोर विज्ञानवादी राष्ट्रधर्माची संकल्पना मांडतात.

'धर्म संकल्पनेचे स्वरूप' या पहिल्या प्रकरणात लेखकाने प्राचीन सामाजिक परिस्थितीचा आढावा घेत धर्माचे महत्त्व स्पष्ट केले आहे. परमेश्वर पुरुषच का? असा प्रश्न उपस्थित करत, स्त्री हीच जननी असल्याने तिच्याचकडून परमेश्वराची निर्मिती झाली असे मानले गेले पाहिजे, असे म्हणत लेखक धर्म व देव ही माणसानेच निर्माण केलेली संकल्पना आहे, असे ठामपणे सांगतात. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला देवतेच्या बाबतीतही दुय्यम ठरवले, ही खंत ते व्यक्त करतात. यासाठीच ते संविधानाधिष्ठित 'राष्ट्रधर्म' हा पर्याय सुचवतात.

दुसऱ्या ते आठव्या प्रकरणांमध्ये लेखकांनी भारतातील प्रमुख धर्मांचा थोडक्यात पण प्रभावी आढावा घेतला आहे. हिंदू, बौद्ध, जैन या प्राचीन धर्मांबरोबरच इस्लाम, शीख, ख्रिश्चन आणि पारशी या धर्मांचा अभ्यास करत त्यांचे मूलभूत तत्त्वज्ञान स्पष्ट केले आहे.

धर्मांमधून नैतिक मूल्यांची शिकवण दिली गेली असली तरी धर्ममार्तंडांच्या स्वार्थी प्रवृतीमुळे धार्मिक कलह व हिंसाचार घडतो, हे लेखकाने सोप्या शब्दांत विशद केले आहे. ग्रंथात कुठल्याही धर्मीयांच्या भावना दुखावू नयेत, याची विशेष काळजी घेतल्याचे प्रकर्षाने जाणवते.

हिंदू धर्माच्या वर्णव्यवस्था, आश्रमधर्म, उपासना पद्धती, आचारविचार यांची मांडणी दुसऱ्या प्रकरणात करण्यात आली आहे. बौद्ध धर्मातील 'धम्म', 'पंचशील', 'अष्टांगमार्ग' यांचे विवेचन तिसऱ्या प्रकरणात आहे. जैन धर्मात २४ तीर्थंकरांच्या उपदेशातून साकार झालेले तत्त्वज्ञान चौथ्या प्रकरणात विस्तारले आहे. इस्लाम धर्माचा उगम, जीवनपद्धती, एकेश्वरवाद यांचा पाचव्या प्रकरणात मागोवा घेतला आहे. शीख धर्माच्या उगमाचे वर्णन सहाव्या प्रकरणात आहे. सातव्या प्रकरणात येशू ख्रिस्त यांचा धर्मद्रोहाचा इतिहास आणि ख्रिश्चन धर्माचे मूलतत्त्व समजावले आहे. आठव्या प्रकरणात पारशी धर्म, त्यांचा भारतात झालेला प्रवेश, आणि त्यांचे समाजातील योगदान याची चर्चा आहे.

नवव्या प्रकरणात लेखक विविध जाती-धर्मांतील दुभंगलेपण दूर करून राष्ट्रीय ऐक्य साधण्याचा प्रयत्न करतात. स्वधर्माचा अभिमान बाळगणे चुकीचे नाही, पण राष्ट्रधर्माच्या माध्यमातून एकात्मता साधणे आवश्यक आहे हे त्यांचे ठाम मत आहे. अंधश्रद्धा, जातीयता, भ्रष्टाचार याविरुद्ध भूमिका घेणे हेच खरे राष्ट्रप्रेम असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

'भारतीयांचा राष्ट्रधर्म' या शेवटच्या प्रकरणात लेखक राष्ट्रधर्माची कल्पना विस्ताराने मांडतात. हे पारंपरिक धर्म नसून आधुनिक काळातील धर्माचे स्वरूप आहे. या धर्माचा पाया भारतीय संविधान असावा, कारण संविधान सर्व धर्मांना समान वागणूक देणारा, धर्मनिरपेक्ष, मानवतावादी ग्रंथ आहे. राष्ट्रधर्मासाठी त्यांनी आचारसंहिता, नित्यकर्मे, सण-उत्सव, संस्कार केंद्रे, पवित्र स्थळे यांचे सविस्तर विवेचन केले आहे.

'धर्म ते राष्ट्रधर्म' या ग्रंथात जातधर्मावरून होणारी दरी, धार्मिक विद्वेष, संघर्ष यावर चिंतनात्मक आणि विज्ञानवादी दृष्टिकोनातून विचार करत धार्मिक सहिष्णुतेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता साधण्याचा आग्रह लेखक धरतात. कोणाच्याही श्रद्धा दुखावू न देता, सामाजिक ऐक्यासाठी 'राष्ट्रधर्म' हाच एकमेव उपाय असल्याचा ठाम संदेश या ग्रंथातून मिळतो.

अर्थात, भारतातील जातीय व्यवस्था, धर्माधारित राजकारण, अंधश्रद्धा, अज्ञान आणि प्रतिगामी प्रवृत्ती यामुळे राष्ट्रधर्माची उभारणी कठीण वाटते. पण लेखकाच्या मते, हे कार्य अशक्य नाही. वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारल्यास राष्ट्रधर्माच्या दिशेने निश्चितच पावले टाकता येतील.

# सुंदर नाते मैत्रीचे



मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द, पण या दोन अक्षरी शब्दांत जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते.

समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की, मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्त्व आहे. श्रीकृष्ण - सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रीतील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रासमोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्राजवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रीची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे. त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो.

जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात, पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात.

मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु. ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात, रोज आठवण व्हावी असे काही नाही. इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री.

अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येतं, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री-पुरुष, जात - पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं.

शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु. ल. नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# विचार करूया

मानव जन्म का लाभला
याचा विचार करू या
माणुसकीचे खरे नाते
हृदयी आपण भरू या
एक ध्येय साऱ्यांचे
असोत अनेक मार्ग
दूर व्हावे विकार अन्
लाभो सदा सन्मार्ग
काळ पाठी लागला
वेळ ही दवडत आहे
कधी करशील सत्कर्म वेड्या
दुर्गुण का निवडत आहे
प्रत्येक अंधारलेल्या वाटेवर
ज्ञानाचा प्रकाश पडावा
अनुभवातून भेद कळावे
सत्याचा संग घडावा
आज पुन्हा एकदा नव्याने
अंतरी सद्भाव भरुया
सारे मिळून एकत्व जपूया
देशाचा विचार करू या

**-पवन श्रीरंगसा कुसुंदल,**
नांदेड
सदस्य, मराठीचे शिलेदार समूह
मो. ९०७५५९५६९५

# आईची माया...

मान प्रतिष्ठा मिळेल तात्पुरता,
पैसा कमवाल तात्पुरता,
वा कीर्ती चढवाल हिमालयासारखी ,
पण मिळणार नाही, माया आई सारखी
जीवनभर त्रास घेईल, पण ते आपल्यासाठी
हिच ती माया घडविते,
सर्वांना पंढरिराया हितासाठी...

**-ॲड. सचिन संभाजी मगर**
चाभरा, ता. अर्धापूर, जि. नांदेड
मो. ७५१७२७२२९३

# बहीण म्हणजे पाऊसगाणं....

बहीण म्हणजे,
पाऊसगाणं असते
मायेन भिजलेलं
चिंब अभाळच भासते

बहीण म्हणजे,
आनंदाची झूळूक असते
आईचं दुसर रुप होऊन
तीच आपल्याला जपते

बहीण म्हणजे,
आधाराची सावली असते
सुख, दु;खाला धावणारी
तीच खरी हितचिंतक असते

भरलेले डोळे पूसण्यासाठी तीच सदा तत्पर असते
निस्वार्थी प्रेमभावनेची
ती साक्षात मूर्तिच असते

बहीण म्हणजे
मायेचा ओलावा असते
कधीच न संपणारा
प्रेमाचा साठा असते

**रूपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१


## थोडक्यात...

### अण्णाभाऊ साठे, टिळकांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** दीपकनगर तरोडा बु. भागातील श्रीनिकेतन प्राथमिक शाळेत साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात सर्वप्रथम, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. सौ. एस. एन. राऊत ह्या होत्या. यावेळी विद्यार्थी प्रतीक गायकवाड, पुनम पिंटू मार्वे, माही केदारे, स्वरा खंदारे, रोहन गजभारे, यश बोधडे, हर्षद कीर्तने, मंजू देशमुख, ममता कसबे यांच्यासह शिक्षक, आयनेले, कल्याणकर यांनी अण्णाभाऊ साठे व बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयनेले यांनी तर उपस्थितांचे आभार सौ. सुरेखा मरशिवणे यांनी मानले.

### एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकपदी बालाजी शिंदे



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथील कार्यरत वाहतुक नियंत्रक बालाजी शिंदे यांची एसटी को-ऑपरेटिव्ह बँक लि. शाखा नांदेडच्या संचालकपदी निवड झाली.

बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल रापम आगार कामगार-कर्मचाऱ्यांच्यावतीने त्यांचा बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी गुणवंत एच.मिसलवाड, दीपक मुदीराज, गौतम कोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# गोदावरी अर्बनचे यश ग्राहकांच्या विश्वासामुळेच -मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले



**नांदेड (प्रतिनिधी)–** गेल्या बारा वर्षांत सहकार क्षेत्रात अल्पावधीतच गोदावरी अर्बनने आपली यशाची भरारी कायम ठेवण्या मागच्या यशाचे गमक हे ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळेच मिळाले आहे, असे गौरवोद्गार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी काढले.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले हे दोन दिवसांच्या नांदेड दौऱ्यावर आले असता त्यांनी १ ऑगस्ट रोजी गोदावरी अर्बनच्या सहकारसूर्य मुख्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी गोदावरी अर्बनच्यावतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला व तसेच मंत्री यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अर्धाकृती पुतळा भेट देण्यात आला. यावेळी शुभेच्छारुपी संदेश देताना मंत्री महोदय बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, अत्यंत कमी कालावधीत गोदावरी अर्बनच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. हे होण्या मागे संस्थेचे संस्थापक आ.हेमंत पाटील, अध्यक्षा राजश्री पाटील यांची प्रचंड मेहनत आणि कर्मचाऱ्यांची ग्राहकांना तत्पर सेवा यामुळे संस्थेची आजवरची ही वाटचाल यशस्वी झाली असून पुढेही ही वाटचाल सुरूच राहील यात दुमत नाही. शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा ही आजवरच्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय आणि मोठी भेट आहे. राजे सहकार क्षेत्रातील अभ्यासू आणि जाणकार व्यक्तीमत्व आहेत. त्यांच्या वडिलांपासून घराण्याला सहकाराचा वारसा आहे. यावेळी त्यांनी गोदावरी अर्बनद्वारे चालविल्या जाणाऱ्या आर्थिक सक्षमीकरणाच्या योजनांच्या आढावा घेतला व ग्रामीण तसेच शहरी भागात आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सेवा देणाऱ्या संस्थेच्या अचूक प्रणालीचे कौतुक केले.

याप्रसंगी व्यासपीठावर आ.बाबुराव कदम कोहळीकर, खा.अजित गोपछडे, भाजपचे प्रविण साले, गोदावरी अर्बनचे सचिव अॅड. रवींद्र रगटे, संचालक प्रा.सुरेश कटकमवार, अजय देशमुख सरसमकर, सदाशिव पुंड यांच्यासह कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# आदर्श गाव निवडीसाठी राज्य शासनाच्या पाहणी पथकाची माळेगाव (यात्रा) येथे भेट




**लोहा (प्रतिनिधी)–** राज्य शासनाच्या आदर्शगाव पाहणी निवडीच्या संदर्भात प्रस्तावाची पडताळणी व क्षेत्रीय पाहणीसाठी कार्यकारी समिती स्तरावरील तांत्रिक पथकाच्या गावभेटीमध्ये लोहा तालुक्यातील माळेगांव यात्रा येथे महाराष्ट्र शासनाच्या पथकाने भेट देऊन पाहणी केली.

राज्य शासनाच्या वतीने राज्यातील आदर्श गाव निवडीसाठी स्वतंत्र पथके नियुक्त करून आदर्श गाव प्रस्तावात निवड झालेल्या गावांना राज्य शासनाच्या पथकांमार्फत भेटी देऊन आढावा घेण्यात येत असतो. सदर प्रस्ताव आदर्श गाव निवडीसाठी शासनाकडे पाठविण्यात येतो. त्याअंतर्गत श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा ता. लोहा जि. नांदेड येथे पाहणी निवड पथक आले होते. सदरील पथकात कृषी उपसंचालक वसंत बिनवडे, कृषी अधिकारी सुदर्शन वायसे, कृषी विभाग आदर्श गाव समितीचे सुरेश शिंदे आदींचा समावेश होता. राज्यस्तरीय आदर्श गाव निवड पाहणी पथकाने गावातील प्रमुख आणि गावकऱ्यांसमवेत चर्चा केली. त्याप्रसंगी गावचे सरपंच हनमंत धुळगंडे, उपसरपंच बालाजीराव नंदाने, तालुका कृषी अधिकारी पोटपेलवार, कृषी पर्यवेक्षक मोहन देशमुख, कृषी सहायक महाके, तलाठी सानप, प्रयाग संस्थेचे सचिव बळीराम केंद्रे, ग्रामविकास अधिकारी देवकांबळे, ग्रा. पं. सदस्य केरबा पाटील, बाबुराव वाघमारे, गोपाळ पाटील, पारोजी वाघमारे, गुणाजी जोंधळे, लक्ष्मीबाई गोकोंडे, लक्ष्मीबाई राठोड, चेअरमन राधाकिशन फुगणर, तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रल्हाद धुळगंडे, पोलीस पाटील पुष्पाताई कोंडापूरे, संजय गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोविंदराव धुळगंडे, जि.प. कें. प्रा. शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर धुळगंडे, शालेय समितीचे अध्यक्ष सटवा निलेवाड, दशरथ मोरे, एन. एस. वाघमारे, ईश्वर धुळगंडे, अहिल्याश्वर धुळगंडे, सतीश फुगणर, मिथुन पाटील, मारुती गंगणे, लिपिक खंडू साखरे सह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. याप्रसंगी शासन आदर्श गाव पुरस्कार प्राप्त हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव यांनी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे उपस्थित गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

# कै.डॉ.जे.जी. वाडेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी)–** राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वसंतनगर, नांदेड येथे कै.डॉ. जनार्दन वाडेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या स्नुषा प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. गायत्री वाडेकर यांनी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी शाळेतील काही प्रज्ञावंत, गुणवंत विद्यार्थी असूनही केवळ आर्थिक परिस्थितीअभावी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे दुरापास्त होते. अशा गरजवंत, होतकरू ५० विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, स्कूल बॅग, वह्या आणि शूजचे वाटप करून मदतीचा हात देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. जनार्दन वाडेकर यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मराठवाडा शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ. गोपाळराव कदम, चंद्रशेखर सोनवणे, नाम देवराव अंबोरे, आनंदराव लाठकर, माधवराव देशमुख तसेच राजर्षी शाहू विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक सुभाष तिवडे, माजी मु.अ. बालाजी हंगरगे, उपमुख्याध्यापक श्रीमती खुळे, कस्तुरबा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक सूर्यकांत टापरे व सर्व शिक्षक उपस्थित होते.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे म्हणाले, डॉ. जनार्दन वाडेकर यांनी लावलेले राजर्षी शाहू विद्यालयाचे रोपटे आता वटवृक्षात रूपांतरी झाले आहे. त्यांच्या वैद्यकीय सेवेबरोबरच समाजकार्याचा वारसा संस्थेच्या हितचिंतक डॉ. गायत्री वाडेकर चालवत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद टापरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. माणिक गाडेकर व राजेश कदम यांनी सहकार्य केले.

# अर्धापूर तालुक्यात डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती विविध कार्यक्रमाने साजरी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील निमगाव येथे साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी सर्व समाज बांधवांच्यावतीने मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारक परिसरात ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर भाजप प्रदेश सचिव रामराव भालेराव, माजी पं.स. सदस्य आनंदराव भंडारे यांच्या हस्ते डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी माजी सरपंच बंटी राठोड, शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष देवराव कांबळे, सरपंच संजय मोळके, ग्राम पंचायत सदस्य विठ्ठलराव कांबळे, संजय गोमासे, किशन कांबळे, एकनाथ कांबळे, आकाश धोंगडे, परमेश्वर कांबळे, अविनाश कांबळे, सुरेश कांबळे, लक्ष्मण कांबळे आदी कार्यकर्त्यांसह समाज बांधव, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याचबरोबर अर्धापूर शहरातील डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रविण देशमुख यांच्या हस्ते डॉ. अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या नियोजित जागेत ध्वजारोहण करुन मान्यवरांच्या हस्ते आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रविणजी देशमुख, बजरंग दलाचे देवगिरी प्रांतप्रमुख कृष्णा देशमुख, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी, सहायक पोलीस निरीक्षक विष्णुपंत कराळे, नगरसेवक सोनाजी सरोदे, व्यंकटी राऊत, शहराध्यक्ष योगेश हाळदे, भाजप प्रदेश सचिव रामराव भालेराव, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, अजामो तालुकाध्यक्ष शंकरराव ढगे, बाळू माटे, सुरेश डक, मुनिरखान पठाण, नारायण कांबळे, गणेश साबळे, पंकज साबळे, नागोराव साबळे, साहेबराव कांबळे, लिंबाजी कांबळे, अशोक हतागळे, मारोती साबळे, विठ्ठल कांबळे आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण करून स्मशानभुमित स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच वंचितचे तालुकासचिव दिपक मगर यांच्या वतीने ग्रामीण रूग्नालयात फळे वाटप करण्यात आले.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्या

### खा.रवींद्र चव्हाण यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र

**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न प्रदान करण्याची मागणी खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

खा.रवींद्र चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले की, भारताचे महान लोकशाहीवादी, क्रांतिकारी विचारवंत, समाजसुधारक आणि प्रसिद्ध साहित्यिक शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्य, गाणी, कविता आणि जनजागृतीपर लेखनातून वंचित, शोषित आणि कामगार वर्गाच्या उत्थानासाठी अविस्मरणीय कार्य केले आहे.त्यांच्या प्रसिद्ध 'फकीरा' या कांदबरीने अनेक साहित्यकृती सामाजिक परिवर्तनाचा आधार बनल्या. समता, बंधुता आणि न्याय्य समाज स्थापन करण्यासाठी त्यांनी लेखणीला एक शस्त्र बनवले. त्यांचे जीवन, संघर्ष आणि साहित्य आजही लाखो लोकांना प्रेरणा देत आहे. साहित्य क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेवून शाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करावे, जेणेकरून त्यांच्या योगदानाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव केला जाऊ शकेल, असे नमूद केले आहे.

# किनवटमध्ये डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात




**किनवट (प्रतिनिधी)–** शहरात लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती शुक्रवारी उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीचा मुख्य कार्यक्रम बसस्थानकाजवळील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ संपन्न झाला.

प्रारंभी आ. भीमराव केराम यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यानंतर त्यांनी व उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानिमित्ताने अण्णाभाऊ साठे पुतळा परिसराच्या केलेल्या सुशोभीकरण कामांचे व 'आय लव्ह किनवट' या सेल्फी पॉईंटचा शुभारंभ आ. केराम यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष के.मूर्ती, इसा खान, रिपाइंचे विवेक ओंकार, कपील नाईक, माजी नगराध्यक्ष साजिद खान, आनंद मच्छेवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे मारूती सुंकलवाड यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. मंचावर मातंग समाजाचे अध्यक्ष शिवन्ना कलगोटवार, रिपाइंचे नेते दादाराव कयापाक, शिवसेनेचे बालाजी मुरकुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सत्यवंश सोनकांबळे यांच्या परिवर्तन गीत गायन पार्टीने प्रबोधन गिते गायली.

# आज पतंजलीतर्फे जडीबुटी दिवस होणार साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** आयुर्वेद शिरोमणी कलियुगाचे धन्वंतरी आचार्य बाळकृष्णजी महाराज यांच्या जन्म दिनानिमित्त आज दि. ३ ऑगस्ट रोजी पौर्णिमानगर येथे सकाळी ९ ते रात्री ८ वाजेच्यादरम्यान जडीबुटी दिवस साजरा करण्यात येणार आहे.

यावेळी जडीबुटी प्रदर्शन होणार असून यात वड, पिंपळ, जांभूळ, उंबर, बेल, आंबा, सिताफळ, रामफळ, गुळवेल, पानफुटी, अश्वगंधा, कांडवेल, समुद्रवेल, नागेली पान, केळी, नारळ, जांब, बोर, अश्वगंधा, सदाबहार, चमकुरा, गवत, एरंडी, रुचकी, जास्वंद, कनेर, फणस, अंगूर, गुलाब, चाफा, कडुलिंब, सागवान, लिची, तुळस, मनीप्लांट, कापूस, लिंबू, ईडलिंबू, करंज, अर्जुन, मोह, संत्री, मोसंबी, लाजाळू, रेनट्री, जखमजुडी, गुलमोहर, धोत्रा, मोगरा, रातराणी, ऊस, हळद, व इतर अनेक वनस्पती रोप व झाडांचे प्रदर्शन भरवले आहे. तसेच आचार्य बाळकृष्ण यांच्या आहार, दिनचर्या, जडीबुटी वनस्पती व त्यांचे लाभाची माहिती असलेले चारशेंच्या वर भिंतीपत्रक या प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात येणार आहे.

यावेळी उद्योजक अनिल शेटकार, वृक्ष मित्र संतोष मुगाटकर, डॉ. रमेश नारलावार, कार्यकारिणी सदस्य पंढरीनाथ कंठेवाड, भारत स्वाभिमानचे जिलहाध्यक्ष राम शिवपनोर, कोषाध्यक्ष महारूद्र माळगे, पंतजली योग समितीच्या नांदेड महिला जिल्हाध्यक्षा नंदिनी चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलनाद्वारे जडीबुटी प्रदर्शनाची सुरुवात होणार आहे.

या प्रदर्शनास पतंजली योग समितीचे पदाधिकारी, योगशिक्षक, योगसाधक भेट देणार आहेत. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले.

# माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त लोह्यात वृक्षारोपण

### आर्य वैश्य समाजाचा पर्यावरणपूरक उपक्रम



**लोहा (प्रतिनिधी)–** राज्याचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा शहरात आर्यवैश्य समाजाच्या वतीने वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थित समाजबांधवांच्या सहभागातून यशस्वी पार पडला.

वृक्षारोपणाच्या माध्यमातून समाजाच्या सामाजिक बांधिलकीचा व पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने सकारात्मक संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सुस्थितीत पार पडलं असून उपस्थितांनी सुधीरभाऊंना शुभेच्छा देत त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव केला.

या कार्यक्रमाचे नेतृत्व आर्यवैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार यांनी केले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष किरण वट्टमवार, बांधकाम समिती उपाध्यक्ष सूर्यकांत कोटगिरे, जिल्हा सदस्य नितीन कोंडावार, उद्योजक तुकाराम कोटलवार, प्रशांत पातेवार, बालाजी कोटगीरे, विजय कटकमवार, तसेच दिपक रूद्रवार, राम वट्टमवार, बंडू कटकमवार, नागेश दमकोंडवार, चंद्रकांत कोंडावार, स्वप्निल दमकोंडवार, विकास कोटलवार, अमोल मोटरवार, स्वप्निल कोटगिरे, मनोज महाजन, भुषण दमकोंडवार, अनिल वट्टमवार, पंकज कोटगिरे, कृष्ण रुद्रवार, हर्ष पोपशेटवार, ऋषिकेश तेललवार, गौरव दमकोंडवार, वैदांत कौडावार यांच्यासह मोठ्या संख्येने आर्यवैश्य समाजाचे सदस्य उपस्थित होते.

# तिरंगानगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती शहरातील तरोडा खु. भागातील तिरंगानगर-रघुनाथनगर येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन करून साजरी करण्यात आली.

जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी याच वसाहतीतील फौजी बालाजी देवकांबळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक एन.एम. कांबळे, सेवानिवृत्त बँक व्यवस्थापक मधूकर उमरे, हरि फुलवरे, अर्जून पवार, प्रा. सुरेश गजभारे व अनिल बेंडकेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मधुकर उमरे यांनी अण्णाभाऊ साठे यांची 'माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतेय काहिली' ही लावणी गायली. तर अध्यक्ष बालाजी देवकांबळे, तुकाराम वाठोरे, एन.एम.कांबळे, प्रा. सुरेश गजभारे यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सेवानिवृत्त जिल्हा माहिती अधिकारी रामचंद्र देठे यांनी केले.

# अखेर 'सरेगावा'त मुलींसाठी बस पोहोचली!

**मुदखेड (प्रतिनिधी)–** सरेगाव (ता. मुदखेड) येथे शालेय विद्यार्थिनींची अनेक वर्षांपासून होणारी ससेहोलपट थांबली असून परिवहन मंडळाची बस गावात पोहचली. यामुळे शालेय मुलींच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. यासाठी मागील दीड महिन्यांपासून संदीपकुमार देशमुख यांनी पाठपुरावा केला होता.

सरेगावातील मुलींना शिक्षणासाठी बारड येथे जावे लागते. परंतु बस गावात येत नसल्याने गावच्या शिवेपर्यंत दोन किलोमीटर जाणे आणि दोन किलोमीटर येणे असा संघर्षमय प्रवास मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम करणारा ठरत होता. शासन एकीकडे 'बेटी पढावो बेटी बचाओ' या अभियानाचा गाजावाजा करत असताना मुलींच्या शाळेत शिक्षणासाठी बस नसल्याने सरेगाव मात्र यास अपवाद ठरले होते. बस नसल्याने पायपीट करण्यासाठी सकाळी सात वाजता घराबाहेर पडावे लागत असे. आणि



पुन्हा सायंकाळी दोन किलोमीटरची तीच ससेहोलपट ठरलेली होती.

याबाबत नांदेड परिवहन विभागीय मंडळाचे प्रमुख चंद्रकांत वडजकर, विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती यांच्याकडे प्रा. संदिपकुमार देशमुख बारडकर लेखी निवेदन देऊन शालेय विद्यार्थिनींच्या प्रवासासाठी गेल्या दीड महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार दि.३० जुलै बस दाखल झाली. यावेळी शालेय मुलींनी गाडीच्या वाहक व चालक यांचा पुष्पहार देऊन सन्मान करत पेढे वाटून जल्लोष व्यक्त केला.

याप्रसंगी तालुका कॉंगेस कमिटीचे अध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर यांनी नारळ फोडून गाडीचे पूजन केले. त्यावेळी प्रा. संदीपकुमार देशमुख, सरपंच बालाजी पाटील, बाबुराव कळणे, गोपिराज कळणे पाटील, भास्कर कळणे, चक्रधर पाटील, भगवान पवार, शिवाजी गिरे, प्रशांत कळणे, पुताजी कळणे, लखन गिरे, चक्रधर कळणे, अविनाश कळणे, सटवाजी कळणे, गजानन कळणे, राम कल्याणकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# चंदेरी

## सलमानबद्दल संजय दत्त म्हणाला,

# सलमान खूप प्रेमळ, लहान भावासारखा!



**संजय दत्तने आजवर अनेक दिग्गज अभिनेत्यांबरोबर काम केले आहे. अनेक समकालीन कलाकारांबरोबरचे त्याचे चित्रपट हिट ठरले आहेत. आता अभिनेत्याने एका मुलाखतीत सलमान खान व अर्शद वारसी या अभिनेत्यांबरोबरच्या मैत्रीबाबत वक्तव्य केले आहे. संजय दत्त म्हणाला, सलमान खूप चांगला, प्रेमळ व्यक्ती आहे. तो माझ्या लहान भावासारखा आहे. मी त्याच्यापासून कधीच वेगळा होऊ शकत नाही, तो माझा भाऊ आहे.**

सलमान खान व संजय दत्त यांनी अनेक चित्रपटांत एकत्र काम केले आहे. 'दस', 'साजन', 'चल मेरे भाई' अशा अनेक चित्रपटांचा त्यात समावेश आहे. 'सिकंदर' चित्रपटाच्या प्रीमिअरवेळी सलमान खानने संजय दत्तबरोबर चित्रपट काढणार असल्याची घोषणा केली होती. हा ॲक्शन चित्रपट असेल असेही सांगितले होते. अद्याप या चित्रपटाची अधिकृत घोषणा केलेली नाही. अर्शद वारसीबद्दल संजय दत्त म्हणाला, की तो माझा सर्किट आहे. तो सर्वोत्तम व्यक्तींपैकी एक आहे. त्याचे विनोदाचे टायमिंग अविश्वसनीय आहे, तो खूप गोड आणि खरा मित्र आहे. संजय दत्तने अर्शद वारसीबरोबर राजकुमार हिरानी यांच्या 'मुन्ना भाई एमबीबीएस' आणि 'लगे रहो मुन्ना भाई' या चित्रपटांमध्ये काम केले आहे. चित्रपटतील मुन्ना भाई आणि सर्किटची ऑनस्क्रीन जोडी बॉलीवूडमधील सर्वात गाजलेल्या जोडींपैकी एक आहे. दोन्ही चित्रपटांमध्ये त्यांच्यातील मैत्रीने लक्ष वेधून घेतले होते. खऱ्या आयुष्यातही त्यांची मैत्री तशीच असल्याचे दिसते. संजय दत्त व अर्शद वारसी हे लवकरच 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. या चित्रपटात अक्षय कुमार, परेश रावल, सुनील शेट्टी, रवीना टंडन, दिशा पटानी असे अनेक लोकप्रिय कलाकार दिसणार आहेत. हा चित्रपट या वर्षी प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, याशिवाय संजय दत्त 'धुवाँधार' या चित्रपटातदेखील दिसणार आहे. या चित्रपटात अर्जुन रामपाल, आर. माधवन, सारा अर्जुन, अक्षय खन्ना हे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट ५ डिसेंबर २०२५ ला प्रदर्शित होणार आहे.

# सलमानचा बॉडीगार्ड शेरा १०० कोटींचा मालक

**सलमान खान त्याच्या व्यवसायिक आयुष्यासह खासगी आयुष्यामुळेही नेहमीच चर्चेत असतो. परंतु, त्याच्या आयुष्यात एक अशी व्यक्ती आहे जी कायम त्याच्याबरोबर असते. तो म्हणजे त्याचा बॉडीगार्ड शेरा. गेल्या अनेक वर्षांपासून तो सलमानचा अंगरक्षक म्हणून काम करत आहे. अशातच आता शेराबद्दल नवीन माहिती समोर आली आहे. सलमानच्या अंगरक्षकाकडे कोट्यवधींची महागडी गाडी असून त्याच्याकडे भरपूर संपत्ती असल्याचं म्हटलं जात आहे.**



शेराने १९९७ मध्ये सलमानचा बॉडीगार्ड म्हणून काम करायला सुरुवात केली होती. त्यावेळी सलमानचा भाऊ सोहेल खानने त्याला सलमानच्या सुरक्षेसाठी विचारलं होतं. त्यापूर्वी शेराने हॉलीवूडमधील कीनू रीव्हज यांच्या भारत दौऱ्यानिमित्त त्यांचा बॉडीगार्ड म्हणून काम केलं होतं. एका मुलाखतीत शेरा म्हणाला होता, की मी भाईसाठी (सलमान) बंदुकीची गोळी खायलाही तयार आहे. सलमान खान शेराबद्दल म्हणालेला, की माझा शेरावर खूप विश्वास आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार शेराकडे बरीच संपत्ती असल्याचं म्हटलं जात आहे. त्याच्याकडे १.४ कोटींची गाडी असून एकूण १०० कोटींची संपत्ती असल्याचं म्हटलं जात आहे. त्याने १.४ कोटींची रेंज रोव्हर ही आलिशान गाडी खरेदी केली आहे. यासह त्याने मुलाखतीमध्ये टायगर नावाने सुरक्षा क्षेत्रात स्वतःची कंपनी सुरू केल्याचंही म्हटलं होतं. शेराबद्दल बोलायचं झालं तर शेराचा जन्म मुंबईतील अंधेरी येथे शिख कुटुंबात झाला होता. त्याचं मूळ नाव गुरमीत सिंग जॉली असं आहे. ११ वी नंतर त्याला महाविद्यालयातून काढण्यात आलेलं कारण त्याला बॉडी बिल्डींग या गोष्टींची खूप आवड होती. त्यानंतर त्याने १९८७ मध्ये ज्युनिअर मिस्टर मुंबई हा किताब जिंकला.

# नाव कमावल्यावरही लग्नाबद्दल बोलतात, कामाबद्दल नाही..!



## अभिनेत्री श्रुती हासनची विशेष : महिलांच्या समस्या, लग्न, वडील, मासिक पाळीचा त्रास... सर्व विषयांवर स्पष्ट भाष्य

**बॉलिवूडमध्येही लौकीक असलेली श्रुती हासन दक्षिणेतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या नायिकांमध्ये गणली जाते. श्रुतीला तिच्या सुपरस्टार वडिलांच्या सावलीतून बाहेर पडण्यासाठी वेळ लागला, परंतु तिने स्वतःचे स्थान निर्माण केले. सध्या ती रजनीकांत अभिनीत कुली चित्रपटामुळे चर्चेत आहे. विशेष मुलाखतीत तिने महिलांच्या समस्या, लग्न, वडील कमल हासन, विभक्त पालक, मासिक पाळीचा त्रास अशा अनेक मुद्द्यांवर स्पष्टपणे भाष्य केले.**



» **प्रश्न : तुझे वडील कमल हसन नेहमीच मोकळेपणाने बोलतात. तुला वाटते का की त्यांना त्याचे परिणाम सहन करावे लागतात?**

**श्रुती :** हो, एखाद्याला त्रास सहन करावा लागतो आणि मलाही तोच आजार आहे (हसते) पण सत्य बोलणे आणि प्रामाणिक असणे हा स्वतःचा आनंद असते. कधीकधी ते हानिकारक किंवा आव्हानात्मक बनते. मी माझ्या वडिलांसारखे वादात पडत नाही. आता, वादात पडणे हे फक्त बाबांच्या कुंडलीतच घडते. ते एक गोष्ट सांगतात आणि लोक ते वेगळे समजतात. बाबा आणि मी सर्वांशी सहमत होऊ शकत नाही आणि आपण सर्वांना आनंदी ठेवू शकत नाही. मी सत्य जगण्यावर विश्वास ठेवते. माझ्या वडिलांच्या रूपात माझ्या घरात एक खूप मोठा सुपरस्टार आहे हे खरे आहे. जितके नम्र आणि मानवी गुणांनी परिपूर्ण तेवढेच ते स्पष्टवक्ते आणि बिनधास्त आहेत. समाज काय विचार करेल, बॉक्स ऑफिसवर काय परिणाम होईल, याचा ते विचार करत नाहीत. त्यांची मानसिकता तशी नाही. ते नेहमीच कलात्मक राहिले आहेत, म्हणून माझा दृष्टिकोनही तसाच राहिला आहे.

» **प्रश्न : तू फिल्मी घराण्यातील एक मजबूत स्वावलंबी मुलगी आहेस, मुलींच्या विषयाला घेऊन तुला सर्वात जास्त काय त्रास होतो?**

**श्रुती हासन :** मुलींशी वागताना होणाऱ्या दुटप्पीपणाचा मला खूप त्रास होतो. एखादा पुरुष ठाम असेल तर त्याला एक दृढ इच्छाशक्ती असलेला व्यक्ती म्हटले जाते, परंतु जर एखादी मुलगी अशा प्रकारे तिचे मत व्यक्त करते तर तिला अहंकारी म्हटले जाते आणि तिला मुलीसारखे बोलावे असे सांगितले जाते. जेव्हा मुलींना इतक्या सहजपणे न्याय दिला जातो तेव्हा मला खरोखरच आक्षेप आहे. त्यांना समान दर्जा दिला जात नाही.

» **प्रश्न : आज बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत, पण तुला वाटते का की एक अभिनेत्री म्हणून, भूमिका असोत किंवा वेतन समानता असो, असमानता कमी झाली आहे?**

**श्रुती :** गेल्या काही वर्षांत हा भेदभाव कमी झाला आहे, पण तरीही अपेक्षेइतका नाही. आज सोशल मीडियावरही बरेच काही घडते. अरे, किती दिवस काम करणार, लग्न कर... अशा टिप्पण्या नायिकेबद्दल ऐकायला मिळतात, पण कोणीही नायकाला असे म्हणत नाही. प्रभास आणि सलमान खानला कोणीही सांगत नाही की पुरे झाले काम, आता लग्न करा. त्यामुळे आताही हा स्त्री-पुरुष दृष्टिकोन आहे. मी मान्य करते की मानधनाची असमानता कमी झाली आहे, अभिनेत्रींना मजबूत भूमिका मिळत आहेत, पण जर मानसिकता बदलली नाही तर काय उपयोग?

» **प्रश्न : लग्न करण्याचा दबाव तुला जाणवतो का?**

**श्रुती :** हो अगदीच. मुलाखतींमध्ये जेव्हा मला वारंवार विचारण्यात येते की मी लग्न कधी करेन, तेव्हा मी म्हणते, की मी लग्नावर विश्वास ठेवत नाही. मला वाटते की जर मी एकदा या विषयावर बोलले तर ते सोडून देतील, परंतु प्रत्येक वेळी विषय लग्नाकडेच सरकतो. मी स्वतःला सिद्ध करण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. मी वेगवेगळ्या गोष्टी करते, परंतु मला एकाच दृष्टिकोनातून पाहिले जाते आणि हे फक्त माझे प्रकरण नाही, हे सर्व मुलींसोबत घडते.

» **प्रश्न : काही काळापूर्वी, तू मासिक पाळीच्या वेदना, पीसीओएस (पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम) आणि एंडोमेट्रिओसिसबद्दल उघडपणे बोलली होतीस, तुला ते करण्याची प्रेरणा कशी मिळाली?**

**श्रुती :** मला नेहमीच माझ्या स्वतःच्या अनुभवाच्या किंवा मी जवळून पाहिलेल्या गोष्टींवर मत मांडायला आवडते. आजपर्यंत मी राजकीय किंवा सामाजिक मुद्द्यांवर बोलले नाही. कारण त्याबद्दल मला माहिती नाही. मला माझ्या अनुभवांवर आधारित बोलायला आवडते. मासिक पाळीच्या वेदना असोत किंवा



पीसीओएस, मी या सर्व गोष्टींमधून गेले आहे. मला वाटले की माझे अनुभव लोकांना मदत करू शकतात, म्हणून मी त्याबद्दल मोकळेपणाने बोलले. त्या काळात, आमच्या इमारतीतील एका काकांकडून मला एक संदेश मिळाला. त्यांनी सांगितले की मासिक पाळीच्या वेदना आणि पीसीओएस बद्दलची माझी मुलाखत पाहिल्यानंतर, त्यांनी त्यांच्या मुलीशी संवाद साधला. तिची समस्या समजून घेण्यासाठी आणि ती सोडवण्यासाठी प्रेरणा मिळाली. त्या संदेशामुळे मला खूप धैर्य मिळाले की एक आई तिच्या मुलीशी या मुद्द्यांवर बोलते, परंतु माझ्या मुलाखतीनंतर, एका वडिलांनी त्यांच्या मुलीशी संवाद साधला.

» **प्रश्न : कलाक्षेत्रात आता तुलाही बराच काळ झाला आहे. तुला कधी वाटले की तू कमल हासनसारख्या मोठ्या मेगा स्टारच्या सावलीतून बाहेर पडली आहेस?**

**श्रुती :** आजच का, मला सुरुवातीपासूनच असे वाटते की मी माझ्या स्वतःच्या वेगळ्या गोष्टी करण्याचा प्रयत्न केला आहे. मी नेहमीच मानते की हासन आडनावाने माझ्यासाठी दरवाजे उघडले. पण हेदेखील खरे आहे की माझे पालक (कमल हासन आणि सारिका) कधीही माझ्या कारकिर्दीसाठी मदत मागत नाहीत. मी काम करत असल्यापासून मी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. जेव्हा तुम्हाला स्वतःचे बिल स्वतः भरावे लागते, बैठका घ्याव्या लागतात तेव्हा ती सावली आपोआप कमी होऊ लागते. आजही, जेव्हा पत्रकार मुलाखतींमध्ये वडिलांबद्दल बोलतात तेव्हा असे वाटते की ती सावली कमी झालेली नाही, पण आज मी त्यांना सावली म्हणून नाही तर प्रकाश म्हणून पाहते.

» **प्रश्न : भूतकाळाकडे मागे वळून पाहताना, तुला असे वाटते का की जर तुझे पालक (सारिका-कमल हासन) विभक्त नसते तर तुझ्या आयुष्यात काही गोष्टी वेगळ्या असत्या?**

**श्रुती :** मला नक्कीच असे वाटते, कारण मी थेरपीच्या क्षेत्रात देखील काम करते. मला मानसशास्त्रातही रस आहे. मला नक्कीच वाटते की जर ते एकत्र राहिले असते तर काहीतरी वेगळे असू शकले असते. पण मग या गोष्टी आपल्या हातात नाहीत. आपण ती गोष्ट बदलू शकत नाही. मला बळी पडण्याची मानसिकता अजिबात आवडत नाही. माझा असा विश्वास आहे की प्रत्येकाच्या कथेत एक घटना असते. प्रत्येकाची एक दुःखद कहाणी असते. मी जर- तर वर विश्वास ठेवत नाही. जे काही घडले, ते घडले, आता माझे लक्ष मी ते कसे हाताळते यावर आहे.

» **प्रश्न : तू विजय, प्रभास, पवन कल्याण सारख्या दक्षिणेतील अनेक मोठ्या स्टार्ससोबत काम केले आहे, पण कुली चित्रपटात रजनीकांतसारख्या सुपरस्टारसोबत काम करण्याचा अनुभव कसा होता?**

**श्रुती :** सर्वप्रथम, मी तुम्हाला सांगते की रजनी सर (रजनीकांत) हे माझ्या वडिलांचे (कमल हासन) समकालीन आहेत, त्यामुळे सेटवर त्यांचे हे नाते खूप उपयुक्त ठरले. त्यांच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले. ते सेटवर एक अद्भूत वातावरण राखतात. ते सेटवर सकारात्मक वातावरण आणतात. ते त्यांच्या उर्जेने सर्वकाही बदलतात. यामध्ये प्रितीची माझी भूमिका देखील अशी आहे की महिला त्याच्याशी नाते जोडू शकतील.

# बिग बॉस १९ कधी सुरू होईल, थीम काय असेल, स्पर्धक कोण असतील!

**बिग बॉस १९ आधीच चर्चेचा विषय बनला आहे. हा सर्वात प्रसिद्ध रिॲलिटी शो असून, तो नेहमीच अधिक नाट्यमय, वाद आणि नवीन स्पर्धकांसह येतो. या शो ने अनेक स्पर्धकांचे करिअर बनवले आहे. दरवर्षीप्रमाणे, यावेळीही हा शो ताजेपणा घेऊन येत आहे. सर्वांना आशा आहे की हा सीझन मागील सीझनपेक्षा अधिक रोमांचक आणि दमदार असेल. आम्ही तुम्हाला या शो शी संबंधित सर्व माहिती देत आहोत...**

बिग बॉस १९ शो २४ ऑगस्ट रोजी सुरू होण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. शोच्या या सीझनची अंतिम तारीख देखील आली आहे. या वेळीही हा शो प्रथम २४/७ ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रसारित होईल. बिग बॉस सहसा कलर्स टीव्ही आणि जिओ सिनेमा दोन्हीवर प्रसारित होतो आणि यावेळी तो कलर्स टीव्हीच्या ९० मिनिटे आधी जिओ सिनेमावर प्रसारित होईल. याचा अर्थ तुम्ही हा शो ओटीटी आणि टीव्ही दोन्हीवर पाहू शकता, परंतु प्रथम तो ओटीटीवर रात्री ९ वाजता आणि नंतर टीव्हीवर रात्री १०:३० वाजता येईल.

## बिग बॉस १९ किती काळ चालेल?

बिग बॉस १९ चा हा सीझन मागील सीझनपेक्षा खूपच मोठा असणार आहे. मागील बिग बॉस सीझन साधारणपणे १५ आठवडे चालायचे, पण हा सीझन २० ते २२ आठवडे चालेल. सलमान खान पुन्हा एकदा होस्ट म्हणून परतणार आहे.

## बिग बॉस १९ ची थीम

यावर्षी शो एक नवीन थीम घेऊन आला आहे, ज्याची थीम आहे - घरवालों की सरकार! जो घरातील सत्तेत मोठ्या बदलाचे संकेत देतो. पहिल्यांदाच, सत्ता एका व्यक्तीच्या हातात राहणार नाही. घर सर्वांच्या इच्छेनुसार चालेल. या बदलामुळे अनेक भांडणे आणि जोरदार वादविवाद होतील.

## बिग बॉस १९ चे स्पर्धक कोण असतील?




बिग बॉस स्पर्धकांच्या यादीबद्दल नेहमीच सस्पेन्स जिवंत ठेवते. तुमचा आवडता अभिनेता किंवा जोडी शोमध्ये सहभागी होत आहे की नाही हे जाणून घेण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यावेळी, काही नावे समोर आली आहेत ज्यात द रिबेल किड अपूर्वा मखीजा, खुशी दुबे, गौरव खन्ना, भाविका शर्मा, धनश्री वर्मा, मिस्ट फैजू, जन्नत झुबेर, धीरज धूपर, चित्रांशी ध्यानी, कनिका मान आणि हुनर हाली यांचा समावेश आहे. पण बिग बॉस १९ मध्ये प्रत्यक्षात कोण असेल? हे शो प्रसारित झाल्यानंतरच कळेल. सध्या तरी, संपूर्ण स्पर्धक यादी किंवा कास्टिंगबद्दल कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

## सलमान खानची फी किती?

या सिझनसाठी सलमान खानची फी आतापर्यंतची सर्वाधिक असण्याची अपेक्षा आहे. अहवालात असे सूचित केले आहे की हा सिझन होस्ट करण्यासाठी १२० ते १५० कोटी रुपये इतके प्रचंड शुल्क सलमान आकारत आहे, जे आतापर्यंतच्या शोसाठी त्याच्या सर्वाधिक कमाईंपैकी एक आहे. तो एकूण १५ आठवडे होस्ट करत असताना दर आठवड्याला ८ ते १० कोटी रुपये कमावण्याची अपेक्षा आहे.



# सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच;राज्य सरकारकडून मार्गदर्शक सूचना



**मुंबई (प्रतिनिधी)**– गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाने पीओपी मूर्तींबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यानुसार घरगुती गणपती, तसेच सार्वजनिक गणपतींच्या सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या सर्व मूर्ती या कृत्रिम तलावातच विसर्जित कराव्या लागणार आहेत. ही नियमावली मार्च २०२६पर्यंत साजऱ्या होणाऱ्या सर्व उत्सवांकरिता लागू असणार आहे.

सार्वजनिक मंडळांच्या सहा फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्तींना विसर्जनासाठी अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नसेल तर नैसर्गिक जलस्रोतात विसर्जित करण्याची परवानगी असणार आहे. पण संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेला विसर्जनानंतर समुद्रतळ किंवा त्या नैसर्गिक जलस्रोताची सफाई करावी लागणार आहे. राज्य सरकारने याबाबतचा शासन निर्णय शुक्रवारी जारी केला.

पीओपी मूर्ती साकारणारे व विक्रेत्यांना मूर्ती विक्री करताना मागच्या बाजूस स्पष्ट दिसेल अशा स्वरूपात ऑइल पेंटने लाल रंगाचे गोलाकार चिन्ह करावे लागणार आहे. तसेच त्यांना नोंदवही ठेवणेही बंधनकारक आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सार्वजनिक मंडळांच्या नोंदणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करावा, विसर्जनाचे योग्य नियोजन व्हावे, यासाठी मंडळाची नोंदणी करताना, मूर्ती पीओपीची आहे की नाही, यासह सर्व आवश्यक माहिती गोळा करावी, सार्वजनिक मंडळांना लहान आकाराच्या मूर्ती बसवण्यासाठी प्रोत्साहित करावे, मंडळांना विसर्जनासाठी लहान, प्रतिकात्मक मूर्ती वापरण्यास आणि मोठी मूर्ती पुढील वर्षी पुन्हा वापरण्यास प्रोत्साहित करावे, मूर्ती विसर्जनासाठी योग्य आकाराचे आणि पुरेशा संख्येने कृत्रिम तलाव तयार करावेत, तलावातील पाणी मूर्तींच्या अपेक्षित क्षमतेच्या आठ ते १० पट असावे, तसेच, कृत्रिम तलावांजवळ इतर निर्माल्य गोळा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी,' असे या सूचनांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई महापालिकेकडून मूर्तिकारांना मोफत शाडूमाती व शाडूच्या मूर्ती घडवणाऱ्यांना मंडपाकरिता मोफत जागा, अशा सुविधा दिल्या जातात. यामध्ये आणखी भर घालत यंदाच्या गणेशोत्सवासाठी मूर्तिकारांना प्रायोगिक तत्त्वावर पर्यावरणपूरक रंग पुरण्यात येणार आहेत. एकूण सहा रंगाचा यात समावेश असून, सात हजार ८०० लिटर रंग आणि तीन हजार लिटर इको प्रायमर पुरवला जाणार आहे.

## बनावट नोटांचा छापखाना उद्धवस्त; ८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**–वाळूज एमआयडीसीमधील साजापूर क्रांतीनगर भागात कार्यरत असलेला बनावट नोटा छापणारा छुपा छापखाना अखेर पोलिसांच्या हाती लागला आहे. अहिल्यानगर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ५९ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या बनावट ५०० रुपयांच्या नोटा जप्त केल्या असून, सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. एकूण ८८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

या घटनेचा तपास पोलिसांनी सुरू करण्याचं कारण ठरलं सिगारेट. २७ जुलैला आंबीलवाडी भागात दोन जण पोलिसांनी ताब्यात घेतली. ते दोघं ५०० रुपयांच्या बनावट रुपयांचा वापर करत सिगारेट खरेदी करत होते. पोलिसांनी बेड्या ठोकत त्यांच्याकडून ८० हजारांच्या बनावट नोटा आणि मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी त्यानंतर छापखान्यावर धाड ठाकली. हा छापखाना वाळूंज येथे कार्यरत होता. तेथे बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरली जाणार शाई, कागद इत्यादी साहित्य जप्त केले गेले. यापासून २ कोटी १६ लाखांच्या नोटा तयार झाल्या असत्या.

या प्रकरणी प्रदीप कापरे, सोमनाथ शिंदे, विनोद अर्बट, आकाश बनसोडे, शिवाजी गंगर्डे, अनिल पवार यांना अटक केली असून मुख्य सुत्रधार अंबादास ससाणे फरार आहे. फरार आरोपीचा शोध पोलिसांकडून करण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी तीन आरोपी छत्रपती संभाजीनगरात बनावट नोटा तयार करण्याचे काम करत होते. तर प्रदीप कापरे हा बनावट नोटा विक्रीसाठी घेऊन जात असे. या टोळीने ५० हजार रुपये देत १ लाखांच्या नोटा दिल्या होत्या.

## पाकिस्तानमधून आरडीएक्सने राम मंदिर उडवण्याचा मेसेज; गुन्हा दाखल

**बीड (प्रतिनिधी)**– उत्तर प्रदेशातील अयोध्येतील श्री राम मंदिर उडवण्याचा मेसेज थेट पाकिस्तानातून बीड जिल्ह्यातील एका तरुणाला आला. या प्रकरणात, तरुणाने शिरूर कासार पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली आहे. शिरूर कासार पोलीस ठाण्याचे पथक या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पोलीस अधिकाऱ्याने शनिवारी सांगितले की, पाकिस्तानमधून आलेल्या या संदेशात तक्रारदार तरुणाला मंदिर उडवण्यासाठी एक लाख रुपयांची ऑफर देण्यात आली आहे आणि या संदेशात असेही नमूद केले आहे की कटात सामील होण्यासाठी आणखी ५० लोकांची आवश्यकता आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, मेसेजच्या ऑडिओ क्लिपमध्ये संशयिताने म्हटले आहे की, आम्हाला सांगा, आम्हाला पाठिंबा द्या, तोंड उघडा, तुम्हाला पैशांची गरज आहे. अयोध्येचे



मंदिर आरडीएक्सने उडवायचे आहे. या कामासाठी आम्हाला पन्नास माणसांची गरज आहे, आरडीएक्स पोहोचवेल, जो कोणी काम करेल त्याला प्रत्येकी एक लाख रुपये मिळतील. जर तुम्ही ते करू शकत नसाल तर तुम्ही इतर कोणताही नंबर देऊ शकता.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, तक्रारदार तरुणाला पटवून देण्यासाठी संशयिताने कराचीमधील एका ठिकाणाचे लोकेशन देखील पाठवले आहे. हा संदेश पाठवणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि सखोल चौकशी सुरू आहे.

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९२/२०२५

अर्जदार – १.लक्ष्मण पि.शेषेराव कदम वयः ४६ वर्षे, धंदा : शेती २. दत्ता पि.शेषेराव कदम वयः ४२ वर्षे, धंदा :शेती ३.बालाजी पि.शेषेराव कदम वयः ३९ वर्षे, धंदा :शेती सर्व रा.बटाळा ता.भोकर जि.नांदेड ४.लक्ष्मीबाई भ्र.नागोराव ढगे वय ४८ वर्षे धंदा शेती रा.पटोदा ता.नायगांव जि.नांदेड

विषय –कलम ३ मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ आपसात सख्खे बहिण भाऊ आहेत. अर्जदार क्र.१ व ४ यांचे वडील आहेत. मयत नामे शेषेराव म्हादजी कदम हे दिनांक ३०/८/२०२५ रोजी बटाळा ता.भोकर जि.नांदेड येथ मयत झाले तसेच अर्जदार क्र.१ ते ४ हेच मयत शेषेराव म्हादजी कदम यांचे कायदेशीर वारस आहेत. असे वारसांचे म्हणणे आहे.

मयत नामे शेषेराव म्हादजी कदम यांचे अर्जदार क्र.१ ते ४ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी खालील नही करण्याऱ्यांनी गुणवंत पिता माधवराव मोरलवार वय ६३ वर्षे धंदा नौकरी रा. २०३ कृष्णा वृंदावन बोलींज नाका अब्रोल ग्रुप विरार (प) ता. वसई जि. ठाने ४०१३०३ यांचे नावे असलेले मौजे वसरनी ता. नांदेड जि. नांदेड नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शेत सर्वे नं. २६/३/१ पैकी व्यंकटाद्री नगर मधील प्लॉट नं. ६९ आहे. ज्याची लांबी पूत्र पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर आहे. व रुंदी दक्षिण उत्तर ३० फुट म्हणजे ९.१४ मीटर आहे. ज्योच क्षेत्रफळ १२०० चौ. फुट म्हणजे १११.५२ चौ. मीटर असून ज्याची चतु:सीमा पुर्वेस २० फुट रस्ता पश्चिमेस प्लॉट नं. ९० दक्षिणेस प्लॉट नं. ६८ असून उत्तरेस प्लॉट नं. ७० आहे.

तसेच प्लॉट नं. ७० ज्याची लांबी पूर्व पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर आहे. व रुंदी दक्षिण उत्तर ३० फुट म्हणजे ९.१४ मीटर आहे. ज्याचे एकुन क्षेत्रफळ १२०० चौ. फुट म्हणजे ११२.५२ चौ. मीटर आहे. ज्याची चतु:सीमा पुर्वेस २० फुट रुंद रोड पश्चिमेस प्लॉट नं. ८९ दक्षिणेस प्लॉट नं. ६९ व उत्तरेस प्लॉट नं. ७१ आहे.वरील वर्णनाचे दोन्ही प्लॉट नं. ६९ व ७० गुणवंत माधवराव मोरलवार यांनी सौदाचिठ्ठी आधारे विजय पांडूरंग लामदाडे वय : ३५ वर्षे, धंदा : व्यापार रा. जुना कौठा नांदेड यांना विक्री करण्याचा करार केला असून मी विजय पांडुरंग लामदाडे यांचे कडून सदरचे दोन्ही प्लॉट खरेदी करण्याचा करार केला असून करारा पोटी काही रक्कम त्यांना अदा केली आहे.

तरि कृपया वरिल दोन्ही प्लॉट बाबत कोणास काही आक्षेप उजर मालकी हक्क देवान घेवान कुळ कर्ज असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आमच्याकडे लेखी कागदपत्रासह आपला आक्षेप दाखल करावा. मुदत संपल्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही असे ग्रहित धरून सदर दोन्ही प्लॉटचे रजिस्ट्री करुन घेण्यात येईल. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारला जानार नाही. म्हणुन हे जाहिर प्रगटन प्रसिध्द करीत अहोत.जाहिर प्रगटन देणार !

**जाहीर प्रगटन देणार**
**रामराव वामनराव हंबर्डे रा.हा.नं.११–७–३६८ कल्याणनगर सोसायटी सिडको नांदेड मो.९०२८०६५३२१**

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी
किरकोळ अर्ज क्र. १६७/२०२५

अर्जदार – १. गोपाळराव पि.उत्तमराव सावंत(गोरठकर) वयः ४३ वर्षे, धंदा : शेती २. उत्तमराव पि.गोपाळराव सावंत(गोरठकर) वयः ४७० वर्षे, धंदा :शेती दोघे रा.महागाव ता.भोकर जि.नांदेड

विरूध्द –

गैरअर्जदार–शाखा व्यवस्थापक शाखाप्रमुख नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा किनी ता.भोकर जि.नांदेड

विषय –भारतीय वारसा कायद कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की, मयत हि अर्जदार क्र.१ यांची आई आहे व अर्जदार क्र.२ यां पत्नी आहे.मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठकर) हे दिनांक १६/८/२०२३ रोजी निझामाबाद येथे मयत झाले. अर्जदार १ ते २ हेच मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठकर) यांचे कायदेशीर वारस आहेत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठकर) यांचे अर्जदार क्र. १ ते २ हेच कायदेशीर वारस आहेत.अर्जदार क्र.१ ते २ यांना मयत नामे आनशाबाई उत्तमराव सावंत (गोरठकर) यांचे गैरअर्जदार शाखा व्यवस्थापक शाखाप्रमुख नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा किनी ता.भोकर जि.नांदेड यांचेकडे बचत खाते क्र.११२९११११११०३०८६ मध्ये जमा रक्कम रूपये ५४,१८०/– रूपये रक्कम काढणे कामी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक १७ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधिताना प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. तुळसीराम पि. जळबाजी जाधव, सारीपुत तुळसीराम जाधव, संघरत्न तुळसीराम जाधव रा. जेतवन नगर नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून पुढीलप्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येते कि,श्री. तुळसीराम पि. जळबाजी जाधव यांना दोन मुल नामे सारीपुत तुळसीराम जाधव, संघरत्न तुळसीराम जाधव व एक मुलगी सौ. वैशाली रावसाहेब चौदन्ते अशी अपत्य असून जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड मधील स.न. ७१ गट न. २३४ मधील एकून क्षेत्रफळ १२०० चौ. फु. चा प्लॉट क्र. ३१ हा त्यांचा स्वकष्टार्जित प्लॉट असून सदर प्लॉट त्यांना त्यांच्या दोन्ही मुलांच्या नावे हस्तांतरित करावयाचा आहे. त्याकरिता श्री. तुळसीराम पि. जळबाजी जाधव यांनी दोन्ही मुलांमध्ये नोंदणीकृत वाटणीपत्र तयार केले असून सदर वाटणी पत्रास त्यांची मुलगी नामे सौ. वैशाली रावसाहेब चौदन्ते यांनी संमतीपत्रा आधारे आपली संमती दिली आहे. भविष्यात दोन्ही भावात वादविवाद होऊ नये या करिता दोघात सदर वाटणी आधारे प्लॉट क्र. ३१ ची समान हिश्यात विभागणी करून सदरील प्लॉट क्र ३१ चा दक्षिणेकडील १५ ु ४० म्हणजे ६०० चौ. फ ु. भाग सारीपुत तुळसीराम जाधव यांना व प्लॉट क्र. ३१चा उत्तरेकडील १५ु४० म्हणजे ६०० चौ. फु. चा भाग संघरत्न तुळसीराम जाधव यांच्या नावे हस्तांतरित करण्याचे निचित करण्यात आले आहे.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास सूचित करण्यात येते कि,श्री.सारीपुत तुळसीराम जाधव व श्री. संघरत्न तुळसीराम जाधव या दोन्ही भावामध्ये स.न. ७१ गट न. २३४ मधील एकून क्षेत्रफळ १२०० चौ. फु. चा प्लॉट क्र. ३१ चे दोन समान हिश्यात म्हणजे प्रत्येकी ६०० चौ. फु मध्ये विभागणी करून त्यांचे नावे जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड मार्फत हस्तांतरित करण्याचे निचित करण्यात आले आहे. त्याबाबत कोणास आक्षेप अथवा उजर असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह जाहीर प्रगटन देणार यांचेकडे खालील पत्त्यावर सादर करावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप अथवा उजर ग्राह्य धरल्या जाणार नाही व दोन्ही भावामध्ये सदर प्लॉट चे समान हिश्यात हस्तांतरण करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन.

**मार्फत** **जाहीर प्रगटन देणार**
**ॲड. पवार विलास एम.** **श्री.तुळसीराम जळबाजी जाधव**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड.** **श्री.सारीपुत तुळसीराम जाधव,**
**मो.७९७२८२१६२६** **श्री.संघरत्न तुळसीराम जाधव**
**सर्व रा. जेतवन नगर तरोडा बु. नांदेड**

## जाहीर प्रगटन

मौज असदुल्लाबाद हद्दीतील शेत गट नंबर २१ पैकी प्लॉट नंबर ८५ साईज ५० बाय २० शेख रहिम पि.शे.नबी रा.पाकीजानगर इतवारा नांदेड यांचेकडून पठाण सईदखान अनवरूल्ला खान रा.कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची** चुर्तसिमा पुर्वेस–प्लॉट नंबर ७३, पश्चिमेस– ७.६१ मीटर रूंद रोड, दक्षिणेस–सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग, उत्तरेस – प्लॉट नंबर ८४ आहे.

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉट खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**पठाण सईदखान अनवरूल्ला खान**
**रा.कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

मौज सांगवी हद्दीतील शेत गट नंबर २९४ पैकी प्लॉट नंबर ३१ साईज १२६ चौरस मीटर रेश्मा खान भ्र.युसून खान पठाण रा.श्रीनगर नांदेड यांचेकडून प्रकाश संभाजी वाघमारे रा.सन्मान कॉलनी तरोडा नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची** चुर्तसिमा पुर्वेस–प्लॉट नंबर ३०, पश्चिमेस–प्लॉट नंबर ३२, दक्षिणेस–९.०० मीटर रूंद रोड, उत्तरेस –गट नंबर २९५.

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉट खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**प्रकाश पि.संभाजी वाघमारे**
**रा.सन्मान कॉलनी तरोडा खु नांदेड**

## जाहीर प्रगटन

याव्दारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री मष्णाजी हुलन्ना पिटलावार राहणार, 'तमजूर ता. देगलूर जि.नांदेड यांनी या कार्यालयात कु अभि विनोद पिटलावार यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

**जन्म झालेल्याचे नाव–कु. अभि विनोद पिटलावार**

सदर व्यक्तीचा तमलूर या ठिकाणी दिनांक ०९.०९.२०१६ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणकरीता दिनांक १४.०७.२०२५ रोजी तहसिल कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक, स्थळ व व्यक्तीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही,

**तहसिलदार**
**देगलूर,**

## जाहीर प्रगटन

याव्दारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री मष्णाजी हुलन्ना पिटलावार राहणार, 'तमजूर ता. देगलूर जि.नांदेड यांनी या कार्यालयात कु अभि विनोद पिटलावार यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

**जन्म झालेल्याचे नाव–कु. अभि विनोद पिटलावार**

सदर व्यक्तीचा तमलूर या ठिकाणी दिनांक ०९.०९.२०१६ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणकरीता दिनांक १४.०७.२०२५ रोजी तहसिल कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक, स्थळ व व्यक्तीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

**तहसिलदार देगलूर,**

## टी.सी.हरवली

माझी शेख अदनान शेख इकबालोद्दीन या नावाची बी.ए.तृतीय वर्षाची पासची टि.सी. दिपनगर ते हिंगोली नाका ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा – **संपर्क पत्ता**

**शेख इदनान शेक इकबालोद्दीन**
**दिप नगर बी.एम.सी कॉलीन**
**नांदेड मो.८७६६५४३८९२**

## टी.सी.हरवली

माझी गणेश चंद्रकांत पांचाळ या नावाची १२ पासची टि.सी. बरबडा ते नांदेड बसने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा –

**संपर्क पत्ता**
**गणेश चंद्रकांत पांचाळ**
**रा.बरबरडा ता.नायगांव**
**जि.नांदेड**




## टी.सी.हरवली

माझी इम्रान खान मोहमद खान या नावाची १० वी पासची टि. सी.,सनद गुणपत्रिका देगलूर नाका ते चौक ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा –

**–संपर्क पत्ता –९–६–**
**५१८ रहेमतनगर गोल्डन**
**बेकरी मोहमदिया मस्जीद**
**जवळ देगलूर नाका नांदेड**
**मो.९७६३९९२२८५**

## Change In Name

My Old Name is MD SHAH UROOJ QURESHI KHAJA MOINUDDIN QURESHI which now I am changing as New Name MOHAMMED SHAHUROOJ QURESHI KHAJA MOINUDDIN QURESHI Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. Add: H.N.7-3-410 NEAR SHAI MASJID SAI NAGAR ITWARA NANDED 431604 MO.8766414331

## Change In Name

My Old Name is YASMEEN ANJUM which now I am changing as New Name YASMEEN ANJUM QUAZI ANGER MOHIBODDIN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: NEAR JAMA MASJID SIPAL MOHALLA HIMAYAT NAGAR NANDED 431802 MO.9423440271

## टी.सी.हरवली

माझी ऋतुजा जळबा पांडागळे या नावाची १२ पासची टि.सी.व मार्कमेमो शिरोढोण ते कंधार बसने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा

**–संपर्क पत्ता –**
**पांडागळे जळबा**
**भिमराव रा.शिराढोण**
**ता.कंधार जि.नांदेड**
**मो.९५१८९१९९२३१**

## Change In Name

My Old Name is SHAIKH UMAR FAROOQ MUZAMMIL SHAREEF which now I am changing as New Name SHAIKH UMAR FAROOQ Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Add-:H.N.1-13-65 GALLI NO 2 PEERBURHAN NGAR TARODA BK NANDED 431601 MO.844660089

## Change In Name

My Old Name is REDDI JAYASHRI GANPAT which now I am changing as New Name JAYSHREE RAJENDRA INGALE Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: AT POST CHANDOLA Tq.MUKHED DIST NANDED 431715 MO.9766162814

## टी.सी.हरवली

माझी कुलदिपसिंग रणजितसिंग चिरागीया या नावाची १० पासची टि.सी. कौठा ते गोविंदबाग ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा – **संपर्क पत्ता –**

**कुलदिपसिंग रणजितसिंग**
**चिरागिया नांदेड**
**मो.७७५५९१०४४६**

ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

## ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस

विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६.

### वर्कींग प्रोफेशनल कोर्सेससाठी प्रवेश सूचना

**शासकीय कर्मचाऱ्यांना शिकण्याची सुवर्णसंधी**

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या प्रवेश प्रक्रिया नियमावली निर्देशानुसार थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांसाठी वर्कींग प्रोफेशनल १२ वी विज्ञान/आयटीआय उत्तीर्ण झालेले व १ वर्षाचा औद्योगिक अनुभव असलेले शासकीय, निमशासकीय, कारखान्यातील (फक्त ५० कि.मी. परिसरातील) कर्मचाऱ्यांना सूचना

**उपलब्ध अभ्यासक्रम**

- Diploma in Civil Engineering
- Diploma in Electrical Engineering
- Diploma in Electronics & Tele-Communication
- Diploma in Mechanical Engineering
- Diploma in Medical Lab Technology

ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस विष्णुपूरी, नांदेड संस्थेत संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया २०२५-२०२६ साठी खालील प्रमाणे प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी सदरील वेळापत्रकानुसार प्रवेश घ्यावा.

| Sr. No. | Activity | Schedule | |
|---|---|---|---|
| | | Start | End |
| 01 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकृती | 02/08/2025 | 04/08/2025 |
| 02 | कागदपत्रांची छाननी व पडताळणी | 02/08/2025 | 04/08/2025 |
| 03 | तात्पुरती गुणवत्ता यादी | 04/08/2025 | दुपारी 2:00 वाजेपर्यंत |
| 04 | हरकती/तक्रार दुरुस्ती | 04/08/2025 | दुपारी 2 ते 4 वाजेपर्यंत |
| 05 | अंतिम गुणवत्ता यादी | 04/08/2025 | सायंकाळी 5:00 वाजता |
| 06 | शाखानिहाय प्रवेश (मुळ कागदपत्र व विहित शुल्क भरणा) | 05/08/2025 | 06/08/2025 |

: संपर्क :

प्रा. कांबळे आर.एस.- 9403962019 | प्रा. सोनकांबळे ए.व्ही.- 9130402590

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## व्यंकटेश चौधरी हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे अधिकारी; सेवापूर्ती कार्यक्रमात डॉ. गोविंद नांदेडे यांचे प्रतिपादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** व्यंकटेश चौधरी हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे गुणवंत शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी असल्याचे प्रतिपादन राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले. ते महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी, विचारवंत आणि शिक्षण विस्तार अधिकारी व्यंकटेश चौधरी यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

व्यंकटेश चौधरी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील वाजेगाव बीट राज्यातील प्रगत आणि उपक्रमप्रवण केलेले आहे. सर्व शिक्षकांना विश्वासात घेऊन चौधरी यांनी केलेले हे आदर्श कार्य राज्यातील इतर अधिकारी आणि शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांसाठी प्रेरक आणि अनुकरणीय असल्याचेही पूर्व शिक्षण संचालकांनी विशद केले.



प्रारंभी प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात संपन्न झालेल्या या देखण्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख व्यंकट गंदपवाड यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका सांगितली. वाजेगाव बीटमधील अक्षर परिवार या विचारवंत शिक्षकांच्या सौजन्याने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी विशद केले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी आणि लेखक देविदास फुलारी, गटशिक्षणाधिकारी आडे आणि शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष मधुकर उन्हाळे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविकानंतर सन्मानमूर्ती शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांना शाल, श्रीफळ, मानपत्र देऊन त्यांच्या सेवापूर्ती प्रीत्यर्थ प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांना सन्मानीत करण्यात आले. व्यंकटेश चौधरी यांच्या निःस्पृह आणि निष्कलंक कार्याचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक देविदास फुलारी यांनी गौरव केला. आपल्या भाषणात देविदास फुलारी यांनी व्यंकटेश चौधरी यांच्या उपक्रमशीलतेची शैक्षणिक फलनिष्पत्ती गुणवत्ते-साठी कारणीभूत असल्याचे विशद केले. शिक्षक संघटनेने सकारात्मक भूमिका घेऊन व्यंकटेश चौधरी यांच्या गुणवत्ता चळवळीस हातभार लावल्याचे प्रतिपादन शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष मधुकर उन्हाळे यांनी केले. आपल्या सेवापूर्ती सन्मानास उत्तर देताना व्यंकटेश चौधरी यांनी संपूर्ण विद्यार्थी विकास हेच प्रत्येक शैक्षणिक उपक्रमाचे उद्दिष्ट्य असल्याचे सांगून आपल्या बीट मधील सर्व शिक्षक बंधू भगिनींनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे आपले बीट सर्वोत्तम राहिल्याचे सांगून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे अत्यंत नेटके सूत्रसंचालन शिक्षक अक्षय ढोके यांनी केले तर आभार दत्तप्रसाद पांडागळे यांनी मानले.

## गावोगावी शाळेच्या वेळात मोबाईल बंद ठेवण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा –हभप इंदोरीकर महाराज



**लोहा (प्रतिनिधी)** – गावोगावच्या सरपंच व गावातील प्रमुखांनी शाळेत जाऊन तेथील समस्या जाणून घ्यावी. तसेच आमदार चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करताना शाळेच्या वेळात मोबाईल बंद व्हावा यासाठी शिक्षक, विद्यार्थी यांना सांगावे आणि त्याची अंमलबजावणी करावी. त्याचा सामाजिक फायदा होईल, असे सांगून आपण काय करावे आणि काय करू नये हे परखडपणे सांगताना येत्या काळात समाजासमोरील असलेली आव्हाने किती धोकादायक आहेत हे विशद करताना प्रसिद्ध कीर्तनकार हभप निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आजच्या सोशल मीडियाच्या व्यवस्थेतून बाहेर पडण्याची गरज असल्याचे सांगितले

लोकनेते, माजी खासदार व आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त संग्राम मोरे व सहकाऱ्यांच्यावतीने लोह्यातील नांदेड बायपास येथील स्व. बाळाजी पाटील मंगल कार्यालयात महाराष्ट्र भूषण प्रसिद्ध समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे कीर्तन पार पडले.

हभप इंदोरीकर महाराज यांनी आजच्या बदलत्या व्यवस्थेवर आपल्या कीर्तनातून परखड मत व्यक्त केले. पैसा जपून वापरा. शेतीत होणाऱ्या अमाप तणनाशकाचा वापर जमिनीची पोत खराब करणारी असून, शेती विकून गाडी, बंगला घेण्याची चढाओढ सुरू आहे. तसेच मोबाईलचा अतिवापर यासह अनेक विषयांवर त्यांनी भाष्य करत उपस्थितांना अंतर्मुख होण्यास भाग पाडले. लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपण माझ्यावर एवढे प्रेम करता यासाठी शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही असे सांगून संग्राम मोरे व सहकाऱ्यांनी हा सोहळा आयोजित केला. आपण मोठ्या संख्येने उपस्थित झालात त्याबद्दलही त्यांनी आभार व्यक्त केले. तसेच सर्वांचे सहकार्य व आपुलकी अशीच राहावी अशाही भावना व्यक्त केल्या.

या कीर्तन सोहळ्यास दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, नांदेड दक्षिणचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश संघटक मुक्तेश्वरराव धोंडगे, राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षा सौ.सुनंदाताई जोगदंड, कंधार नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ.अनुसयाताई केंद्रे, लोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार कंदार नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष स्वप्नील पाटील लुंगारे माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माणिकराव मुकदम,कल्याणराव सूर्यवंशी माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धूतमल, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## वसरणी गावाकरिता भुयारी मार्ग करण्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील वसरणी या गावासाठी भुयारी मार्ग करण्यात यावे यासाठी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भेट देऊन लवकरच केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील वसरणी हे गाव महामार्गाच्या दक्षिण–उत्तर दोन्ही बाजूला आहे. या गावाची लोकसंख्या दक्षिण भागाला ५ ते ६ हजार तर उत्तरेला मूळ गावात ८ ते १० हजार लोकसंख्या असून, या महामार्गामुळे दोन्ही बाजूने होणारी दररोजची दळण–वळण, कामाला जाणारे कामगार, मूळ गावात जि.प.शाळा असल्यामुळे तिथे जाणारे शाळकरी विद्यार्थी, दक्षिण भागात असलेल्या शेतीमुळे गावातून जाणारे गुरे–ढोरे या सर्वांना दक्षिणेकडून उत्तरेकडे ये–जा करण्यासाठी महामार्ग ओलांडून जावा लागणार आहे.

या मार्गावर मोठ्या गाड्यांची वेग क्षमता जास्त असल्यामुळे या ठिकाणी जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच अंत्यविधीचे ठिकाण राष्ट्रीय महामार्गाच्या उत्तर बाजूस आहे. त्याचबरोबर गावातील तीर्थस्थळे (मंदिर, विहार, मज्जीद) हे मूळ गावात असल्यामुळे दररोज ये–जा करण्यासाठी हा महामार्ग धोकादायक ठरू शकतो. भारतीय राष्ट्रीय प्राधिकरणाच्या I.R.C SP: ८४–२०१४ या मार्गदर्शक तत्त्वामधील २.१३.३ मध्ये असे अधोरेखित करते की, हलके वाहनासाठी अंडरपास दिला जाऊ शकतो.

## आ. चिखलीकर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा श्रावण बरसला

### ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, एकनाथ शिंदे, सुनील तटकरे यांच्यासह अनेक मान्यवरांकडून अभीष्टचिंतन

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार–लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी त्यांच्यावर शुभेच्छांचा श्रावण बरसला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राज्यसभा खासदार सौ. सुनेत्राताई पवार, उत्तर प्रदेशातील खासदार अरुण कुमार, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव तथा पर्यावरण व हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री सौ. पंकजाताई मुंडे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी खासदार डी. बी. पाटील, सेवानिवृत्त आयएएस अधिकारी अरुण डोंगरे, माजी खासदार शिवाजीराव माने यांच्यासह राज्यातील अनेक आमदार, खासदार, आजी–माजी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांनी अभीष्टचिंतन केले.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस याही वर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. २ ऑगस्ट रोजी रात्री बारा वाजून एक मिनिटांनी आ. चिखलीकर यांचे औक्षण करण्यात आले. त्यानंतर अभीष्टचिंतनासाठी अलोट गर्दी उसळली होती. पहाटे ५ वाजेपर्यंत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अभीष्टचिंतनासाठी आणि शुभेच्छा देण्यासाठी चाहत्यांची प्रचंड गर्दी उसळली होती. असंख्य केक कापून आणि पुष्पगुच्छ, पुष्पहार, शाल देऊन चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांना दीर्घ आयुष्याच्या, निरोगी आरोग्याच्याही शुभेच्छा दिल्या.

जिल्हाभरात वाढदिवसानिमित्त अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे



आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीर पार पडले. कंधार–लोहा येथे सत्कार करण्यात आला. लोहा, कंधार विधानसभा मतदारसंघातील तब्बल १०० हून जास्त ठिकाणी आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभहष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

माजी आ. शामसुंदर शिंदे, आ. अभिमन्यू पवार, आ. जितेश अंतापूरकर, आ. भीमराव केराम, माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी आ. सुभाषराव साबणे, माजी आ. राम पाटील रातोळीकर, जालनाचे माजी आ. अरविंद चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, बारूळ नामदेव महाराज यांच्यासह अनेकांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

## नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेश पावडे व पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात पक्षसंघटन सक्षम –खा. चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी) –** अगदी एनएसयूआय, युवक काँग्रेसपासून काम करत आज राजेश पावडे हे उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. त्यांना पक्षसंघटनेचा मोठा अनुभव आहे, नवनिर्वाचित प्रदेश पदाधिकारी यशपाल भिंगे, डॉ. श्रावण रॅपनवाड, सुरेंद्र घोडजकर, डॉ. दिनेश निखाते, डॉ. रेखा चव्हाण, धनराज राठोड हे तळागाळातील कार्यकर्ते आहेत. त्यांना देखील पक्ष संघटनेचा मोठा अनुभव आहे. त्यात दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांची दक्षिण जिल्ह्यावर संघटनात्मक पकड आहे. ज्येष्ठ नेते तथा माजी आ. ईश्वरराव भोसीकर यांचे मार्गदर्शन आहे. यामुळे जिल्ह्यातील पक्षसंघटन अधिक सक्षम होईल, असा विश्वास खा. रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.



खा. रवींद्र चव्हाण, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, ज्येष्ठ नेते माजी आ. इश्वरराव भोसीकर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश पावडे, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, प्रदेश सरचिटणीस डॉ. श्रावण रॅपनवाड, अॅड. सुरेंद्र घोडजकर, डॉ. दिनेश निखाते, डॉ. रेखा चव्हाण, प्रदेश सचिव धनराज राठोड आदींचा पदग्रहण व सत्कार सोहळा शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी जिल्हा काँग्रेस कार्यालय येथे संपन्न झाला. यावेळी खा. रवींद्र चव्हाण हे बोलत होते.

यावेळी मसुद खान, महेश देशमुख तरोडेकर, बालाजी गाडे, प्रफुल्ल सावंत, बालाजी चव्हाण, शमिम अब्दुला, डॉ. करुणा जमदाडे, सुरेश हटकर, रहिम खान, सत्यपाल सावंत, प्रवक्ते मुन्तजीब, बापूसाहेब पाटील, गंगाधर सोनकांबळे, सतीश देशमुख तरोडेकर, शंकर शिंदे, नसिम पठाण, प्रल्हाद ठगे, गोविंदबाबा गौड, निरंजन पावडे, रमेश चित्ते, रंगराव भुजबळ, सुभाष किन्हाळकर, गोडसे, पथ्वीराज तुपदळे, संदीप देशमुख, तात्याराव शिंदे, विलास पावडे, मोहम्मद वाजिद, दीपकसिंग हुजूरीया, गगन यादव, अंबादास रातोळे, शेख मुख्तार, महेश शिंदे, गोविंद पाटील, अझर भाई, नईम शेख, तुषार पोहरे, धनंजय उमरीकर आदींसह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी) –** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५–२६ मध्ये सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत होती. परंतु शेतकऱ्यांना पीक विमा भरताना पोर्टलवर येत असलेल्या अडचणी लक्षात घेता केंद्र शासनाने बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी १४ ऑगस्ट व कर्जदार शेतकऱ्यांना ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढ दिली आहे.

आतापर्यंत ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरला नाही, अशा बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी १४ ऑगस्ट व कर्जदार शेतकऱ्यांना ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षक संवाद मेळावा व सन्मान कर्तृत्वाचा कार्यक्रमाचे आज आयोजन


**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा–कंधार विधानसभेचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षक संवाद मेळावा व सन्मान कर्तृत्वाचा या कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी गणराज बँक्वेट हॉल नमस्कार चौक नांदेड येथे सकाळी १० वा. करण्यात आले आहे.

यात वृक्षारोपण, गौरव गुणवंतांचा, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात सन २०२४–२५ मध्ये विभाग जिल्हा व तालुका स्तरावरील विजेत्या शाळांचा सन्मान करण्यात येणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन देविदासराव बस्वदे, जीवनराव वडजे, फारुख बेग, अशोक पाटील मारतळेकर, दत्ता भोसले, जे. डी. कदम, उध्दव सूर्यवंशी, चंद्रकांत मेकाले, रमेश पवार, मंगल सोनकांबळे, छत्रपती शिवाजी राजे प्रतिष्ठान व संयोजन समिती शिक्षक संघटना पदाधिकारी यांनी केले.




## सुधाकर शिनगारे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी) –** शहरातील सतवतीअप्पा चौकातील सुधाकर शेषराव शिनगारे यांचे अल्पशा आजाराने शनवारी, दि.२ रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्यावर रविवार, दि. ३ रोजी सकाळी १० वा. माळी समाज स्मशानभूमी अर्धापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सुधाकर शिनगारे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, आई असा परिवार आहे. ते सामाजिक कार्यकर्ते आनंदराव शिनगारे, दादाराव शिनगारे, बाबाराव शिनगारे यांचे छोटे बंधू होत. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.



## आ.बोंढारकर यांच्यावर अभीष्टचिंतनाचा वर्षाव

### ■ मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री पवार, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री मुनगुंटीवारसह अनेक मान्यवरांकडून शुभेच्छा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांनी अभीष्टचिंतनाचा वर्षाव केला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खा. अशोकराव चव्हाण, खा. अजित गोपछडे, राज्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार, ना. हेमंत पाटील, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह राज्यातील अनेक खासदार, आमदार, आजी–माजी लोकप्रतिनिधी आणि चहात्यांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले.



आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या नेतृत्वावर नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जनतेने प्रचंड विश्वास दाखवला आहे. गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी विधानसभेत आवाज उठवणारे आ. बोंढारकर हे शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करत आहेत. आमदार म्हणून निवडून आल्यानंतर आयोजित करण्यात आलेला त्यांचा हा पहिलाच वाढदिवस अत्यंत हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त गुरुद्वारा येथे त्यांनी माथा टेकून आशीर्वाद घेतले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. ग्रामदेवतेचेही त्यांनी दर्शन घेतले. वडिलांच्या समाधीवर डोके टेकून आशीर्वाद घेतल्यानंतर आ. आनंदराव बोंढारकर यांचा नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक ठिकाणी सत्कार करण्यात आला.

कौठा नांदेड येथील मातोश्री मंगल कार्यालयात ह.भ.प रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तनातून भक्तीरस ओसंडून वाहिला तर याच ठिकाणी महाआरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, शालेय विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटपही करण्यात आले.

यावेळी शुभेच्छा देण्यासाठी संत बाबा बलविंदर सिंघ, संत दत्ता बापू, गुरुवर्य श्री श्री १०८ महंत समगिर महाराज यांच्यासह आदी संत महंतांसह राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com